उल्लास ULLAS
जन जन साक्षर
नव भारत साक्षरता कार्यक्रम

सा विद्या या विमुक्तये
CELL FOR NATIONAL CENTRE FOR LITERACY
राष्ट्रीय साक्षरता केंद्र–प्रकोष्ठ

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

ज्ञानसेवा तु साफल्यम्
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

साक्षरतेकडून समृद्धीकडे...
राज्य साक्षरता केंद्र, महाराष्ट्र, पुणे

# उल्लास

## नव भारत साक्षरता कार्यक्रम

## राज्य विशेषांक २०२४



**राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण व**
**राज्य साक्षरता केंद्र,**
**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.**

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# उल्लास

## नव भारत साक्षरता कार्यक्रम

## राज्य विशेषांक २०२४



**राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण व**

**राज्य साक्षरता केंद्र,**

**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.**

## उल्लास – नव भारत साक्षरता कार्यक्रम : राज्य विशेषांक २०२४


- **प्रेरणा** : **मा. ना. दीपक केसरकर**
  मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य.
  **मा. आय. ए. कुंदन (भा.प्र.से.)**
  प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य.
  **मा. सूरज मांढरे (भा.प्र.से.)**
  आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
- **मार्गदर्शक** : **श्री. राहूल रेखावार (भा.प्र.से.)**
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **डॉ. महेश पालकर**
  शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे.
  **श्री. रमाकांत काठमोरे**
  सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **श्रीम. अनिता कडू**
  सहसंचालक, शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे.
- **निर्मिती आणि संपादन** : **डॉ. राजेश क्षीरसागर**, उपसंचालक, शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे.
  **डॉ. माधुरी सावरकर**, उपसंचालक तथा विभाग प्रमुख, राज्य साक्षरता केंद्र, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **डॉ. गितांजली बोरुडे**
  उपविभाग प्रमुख, राज्य साक्षरता केंद्र, राज्य शै. सं. व प्र. प., महाराष्ट्र, पुणे.
  **श्री. रामदास वालझडे**, उपशिक्षणाधिकारी, शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे.
  **श्री. पंढरीनाथ जाधव**, अधिव्याख्याता, राज्य साक्षरता केंद्र, राज्य शै. सं. व प्र. प., महाराष्ट्र, पुणे.
- **समन्वयक** : **श्री. विराज खराटे**, सहायक योजना अधिकारी, शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे.
  **श्रीम. दैवशाला शिंदे**, विस्तार अधिकारी, शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे.
  **श्रीम. लीना भागवत**, विस्तार अधिकारी, शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे.
  **श्री. अण्णासाहेब कुटे**, विषय सहाय्यक, राज्य साक्षरता केंद्र, राज्य शै. सं. व प्र. प., महाराष्ट्र, पुणे.
  **श्रीम. विनया भोसले**, विषय सहायक, राज्य साक्षरता केंद्र, राज्य शै. सं. व प्र. प., महाराष्ट्र, पुणे.
- **साहाय्य** : **श्री. सुनील बासुतकर**, विषय सहायक, शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे.
  **श्री. महेंद्र बागडे**, विषय सहायक, शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे.
  **श्री. रोहित यादव**, प्रोग्रामर, शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे.
  **श्री. शशिकांत नकाते**, डेटा एंट्री ऑपरेटर, शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे.
- **अर्थसहाय्य** : राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण, शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे.
- **प्रकाशक** : शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे.
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. (राज्य साक्षरता केंद्र)
- **प्रथम आवृत्ती** : सप्टेंबर २०२४.
- **मुद्रक** : रुना ग्राफिक्स, पुणे.


- सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन.



# शुभेच्छा संदेश

संयुक्त राष्ट्राच्या शाश्वत विकास (SDG) ध्येयानुसार व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२० मधील शिफारशीनुसार सन २०३० पर्यंत १०० टक्के साक्षरतेचे उद्दिष्ट साध्य करावयाचे आहे. यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दि. १४ ऑक्टोबर, २०२२ च्या शासन निर्णयानुसार संपूर्ण राज्यात सन २०२२-२३ ते २०२६-२७ या कालावधीत केंद्र पुरस्कृत उल्लास नव भारत साक्षरता कार्यक्रम राबविला जात आहे. प्रौढ शिक्षण ऐवजी सर्वांसाठी शिक्षण या संज्ञेनुसार हा उपक्रम देशातील सर्व तरुण आणि प्रौढ, पुरुष आणि स्त्रिया अशा सर्वांनी पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान तसेच मूलभूत जीवन कौशल्ये संपादन करावीत यावर भर देत आहे.

केंद्र शासनाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय उल्लास मेळाव्याप्रमाणे राज्य स्तरावर उल्लास मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र राज्याचा राज्य विशेषांक प्रसिद्ध होत आहे. यापूर्वीही महाराष्ट्र राज्याने विविध शैक्षणिक अभियानात आपल्या कामाचा देश पातळीवर ठसा उमटविला आहे. त्याप्रमाणेच उल्लास नव भारत साक्षरता कार्यक्रमातही महाराष्ट्र राज्य अग्रेसर राहील. यासाठी सर्व क्षेत्रातील व्यक्तींची मोलाची साथ अतिशय महत्त्वाची आहे.

राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण व राज्य साक्षरता केंद्र, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांच्यामार्फत या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी होत असणाऱ्या सर्व प्रयत्नांचा लेखाजोखा असणाऱ्या या राज्य विशेषांकास मन:पूर्वक शुभेच्छा!

**दिपक केसरकर,**
मंत्री,
शालेय शिक्षण व मराठी भाषा,
महाराष्ट्र राज्य.
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२



## शुभेच्छा संदेश

व्यक्ती, समाज व देश यातील परस्परसंबंध आणि सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव दृढ होण्यासाठी 'सर्वांसाठी शिक्षण' ही योजना अत्यंत उपयुक्त ठरत आहे. 'उल्लास नव भारत साक्षरता कार्यक्रम'च्या माध्यमातून साक्षरतेची जी अभूतपूर्व लोक चळवळ उभी राहिली आहे, ती खूपच अभिमानास्पद आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे शासन निर्णय दिनांक १४-१०-२०२२ अन्वये सन २०२२-२३ ते २०२६-२७ या कालावधीत उल्लास नव भारत साक्षरता कार्यक्रमाची अंमलबजावणी करणेबाबत निर्णय घेण्यात आला आहे. तसेच शासन निर्णय दि. २५-०१-२०२३ अन्वये सदर योजनेचे नियोजन व अंमलबजावणीसाठी राज्य, जिल्हा, गट व शाळा स्तरावर समित्यांची स्थापना करण्यात आली आहे.

१५ वर्षे व त्यापुढील वयोगटातील सर्व असाक्षर व्यक्तींना साक्षर करण्याचे मुख्य उद्दिष्ट आहे. त्यांना वाचन आणि लेखनापासून व्यावसायिक कौशल्ये, कला, विज्ञान, तंत्रज्ञान, संस्कृती, क्रीडा व मनोरंजन या विषयासाठी केंद्राच्या धर्तीवर राज्याने देखील अध्ययन-अध्यापन साहित्य उपलब्ध करून दिले आहे. स्वयंसेवक, नवसाक्षर, असाक्षर यांनी या साहित्याचा पुरेपूर वापर करून १०० टक्के साक्षरतेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रयत्नशील राहावे असे आवाहन करण्यात येत आहे.

राज्य स्तरावर असाक्षरांचे उद्दिष्ट संख्या व असाक्षर नोंदणी उद्दिष्ट संख्या निश्चित करण्यात आली आहे. जिल्ह्यांना सन २०११ च्या जनगणनेतील आकडेवारीनुसार असाक्षर लोकसंख्येच्या प्रमाणात उद्दिष्ट निर्धारित करण्यात आलेले आहे. हे नोंदणीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी, तसेच केंद्र पुरस्कृत नव भारत साक्षरता कार्यक्रमाचा प्रचार व प्रसारासाठी आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय उल्लास मेळाव्यासाठी तसेच राज्य विशेषांकासाठी मन:पूर्वक शुभेच्छा!

**आय. ए. कुंदन** (भा. प्र. से.)
प्रधान सचिव,
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन.



# शुभेच्छा संदेश

महाराष्ट्र राज्याचे शालेय शिक्षण मंत्री मा. ना दिपकजी केसरकर, प्रधान सचिव, मा. आय. ए. कुंदन (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली व त्यांच्या प्रेरणेने या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण (SLMA), शिक्षण संचालनालय (योजना) व राज्य साक्षरता केंद्र, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे आटोकाट प्रयत्न करत आहेत, तसेच अनेक स्वयंसेवक सामाजिक बांधिलकीतून असाक्षरांना साक्षर करण्यासाठी मोलाचे योगदान देत आहेत, त्याबद्दल प्रथमतः आपले सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन...!

'Understanding of Lifelong Learning for All in Society' अर्थात, ULLAS, म्हणजेच 'समाजातील सर्वांसाठी आजीवन शिक्षणाची समज' निर्माण होण्यासाठी महाराष्ट्रातील सर्व शिक्षित समाज घटकांच्या सक्रिय सहभागाची अपेक्षा व्यक्त करतो. शालेय शिक्षण व साक्षरता मंत्रालय, नवी दिल्ली, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्याद्वारे राज्य स्तरावरून आवश्यक ती सर्व कार्यवाही केली जात आहे. जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, तहसील कार्यालय, पंचायत समिती, ग्रामपंचायत शाळा, अनेक सेवाभावी संस्था आणि 'आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो' या सामाजिक जाणीवेतून सहभागी असलेले सर्व स्वयंसेवक यांच्याद्वारे नियोजनबद्ध कार्यक्रमांतून 'साक्षरतेकडून समृद्धीकडे' जाण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न करत आहेत, म्हणूनच 'उल्लास नव भारत साक्षरता कार्यक्रम' या कार्यक्रमासाठी केंद्राने दिलेले 'जन जन साक्षर' हे घोषवाक्य आपण सर्वांच्या प्रयत्नाने नक्कीच सार्थ ठरवू, असा मला ठाम विश्वास वाटतो.

सामाजिक दायित्व म्हणून सदर योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी व योजनेच्या यशस्वितेसाठी आपण सर्व स्तरावरून विविध उपक्रमांद्वारे करत असलेल्या अखंड प्रयत्नांना माझ्या शुभेच्छा!

तसेच राज्यस्तरीय उल्लास मेळाव्याच्या निमित्ताने प्रसिद्ध होत असलेल्या या राज्य विशेषांकास मनःपूर्वक शुभेच्छा!

**सूरज मांढरे** (भा. प्र. से.)
आयुक्त (शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, पुणे.



## शुभेच्छा संदेश

एकविसाव्या शतकातील नवनवीन आव्हानांना सामोरे जाण्यासाठी, विविध कौशल्ये आत्मसात करून शिक्षित व विकसित भारत घडवण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण NEP-2020 यामध्ये व्यावसायिक शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे. या NEP-2020 च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ULLAS - Understanding of Lifelong Learning for All in Society 'नव भारत साक्षरता कार्यक्रम'च्या निमित्ताने देशाच्या समग्र विकासात समाजाचा वाढत चाललेला सहभाग हा नक्कीच आशादायी ठरत आहे. या अभियानाच्या माध्यमातून राष्ट्रीय सर्वांगीण विकास साधण्यासाठी १५ वर्षे व त्यापुढील असाक्षर जे औपचारिक शिक्षण घेऊ शकले नाहीत अशा असाक्षरांना स्वयंसेवकांमार्फत पायाभूत साक्षरता, डिजिटल साक्षरता, कायदेविषयक साक्षरता, आर्थिक साक्षरता, रोजगार उपलब्धीसाठी कौशल्य विकास, स्वच्छता, आरोग्य शिक्षण, पर्यावरण संवर्धन, आपत्ती व्यवस्थापन इ. विषयांचे ज्ञान दिले जात आहे.

शिक्षणातून माणूस घडविण्याच्या दृष्टीने शासन, प्रशासन सातत्याने प्रयत्न करत आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात शिक्षणाचा विचार अधिक गंभीरपणे करण्याची गरज आहे. भारताच्या प्रत्येक नागरिकाने कार्यप्रवणशील, उपक्रमशील, उद्योगकुशल असण्याची नितांत गरज आहे. यासाठीच 'उल्लास : नव भारत साक्षरता कार्यक्रम च्या' प्रचार व प्रसारासाठी 'वारी साक्षरतेची', 'उल्लास राज्यस्तरीय मेळावा', 'यंदाचा गणेशोत्सव साजरा करू. नव भारत साक्षरता कार्यक्रम सोबत' यांसारखे अनेक उपक्रम राबवून असाक्षरांची उत्कृष्ट नोंदणी, स्वयंसेवक नोंदणी वाढण्यास मदत झाली आहे. साहित्य विकसन, अध्ययन-अध्यापन वर्ग, FLNAT परीक्षा उत्कृष्ट निकाल, याबाबत उत्कृष्ट कामगिरी करून जास्तीत जास्त सामाजिक घटकांना या राष्ट्रीय कार्यात सहभागी करून घेण्यासाठी आपली सर्व यंत्रणा प्रयत्नशील आहे हे खूप अभिमानास्पद आहे. या उपक्रमात आपण सर्व संस्था, सेवाभावी संस्था, शाळा, स्वयंसेवक, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, विद्यार्थी, पालक, क्षेत्रीय यंत्रणा, पर्यवेक्षीय यंत्रणा, प्रशासकीय यंत्रणा यांनी अत्यंत सक्रिय सहभाग घेऊन या कार्यक्रमाला अधिक गती देण्याचे काम कराल अशी अपेक्षा व्यक्त करतो व आपण करत असलेल्या कार्याबद्दल आपले सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि पुढील कार्यासाठी खूप खूप शुभेच्छा!

**राहूल रेखावार** (भा. प्र. से.)
संचालक,
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे.

# प्रस्तावना

राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० मधील शिफारशींना कार्यान्वित करण्यासाठी भारत सरकारने 'उल्लास : नव भारत साक्षरता कार्यक्रम' १ एप्रिल, २०२२ रोजी सुरू केला आहे. भारतातील वर्तमान परिस्थितीत १८.१२ कोटी प्रौढ अजूनही असाक्षर आहेत. सन २०२३ पर्यंत १०० टक्के साक्षरता प्राप्तीचे लक्ष्य निर्धारित केलेले आहे. या लक्ष्य प्राप्तीसाठी राष्ट्रीय व राज्य स्तरावर विविध कार्यक्रम घेतले जात आहेत.

महाराष्ट्र राज्यासाठी सन २०२२-२३ व २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी १२,५०,००० असाक्षरांना साक्षर करण्याचे उद्दिष्ट दिलेले आहे. सदरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी राज्य साक्षरता केंद्र, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी असाक्षरांसाठी अभ्यासक्रम विकसित केलेला आहे. यामध्ये उल्लास प्रवेशिका : भाग - १ ते ४, स्वयंसेवक मार्गदर्शिका, उल्लास संक्षिप्त मार्गदर्शिका, उल्लास संक्षिप्त स्वयंसेवक मार्गदर्शिका, मूल्यांकन पत्रिका, कृतिपत्रिका, प्रश्नपेढी, चला जाऊया गोष्टींच्या गावा... इत्यादी पुस्तिका तयार करण्यात आलेल्या आहेत. तसेच राज्यस्तर ते शाळास्तर पर्यंत शिक्षक व स्वयंसेवकांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात उल्लास ॲपवर एकूण ६,४८,७९९ असाक्षरांनी नोंदणी केली आहे. यांपैकी ४,५९,९९४ असाक्षरांनी परीक्षा दिली, त्यांपैकी ४,३५,९०१ असाक्षर हे नवसाक्षर झाले, तर २४,०९३ असाक्षरांना 'Need Improvement' असा शेरा मिळाला आहे. सन २०२४- २५ या शैक्षणिक वर्षात एकूण ८,०४,०९९ इतक्या असाक्षरांना (मागील शैक्षणिक वर्षातील राहिलेले व चालू) साक्षर करण्याचे उद्दिष्ट आहे.

वरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी राष्ट्रीय व राज्य स्तरावर विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जात आहे. नवी दिल्ली येथे दि. ०६ व ०७ फेब्रुवारी, २०२४ रोजी 'उल्लास मेळा' आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात शिक्षण संचालनालय (योजना) तथा राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण व राज्य साक्षरता केंद्र, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी सहभाग घेतला होता. या उल्लास मेलामध्ये आपल्या राज्याने 'उल्लास - नव भारत साक्षरता कार्यक्रम'च्या अनुषंगाने चालू असलेल्या कार्याची माहिती दिली तसेच राज्याच्या स्टॉलवर राज्य साक्षरता केंद्राने विकसित केलेल्या अभ्यासक्रमाचे प्रदर्शन मांडले. यावेळी नव भारत साक्षरता कार्यक्रम पोवाड्याच्या माध्यमातून प्रदर्शित केला. राज्यातील असाक्षर, नवसाक्षर व त्यांना अध्यापन करणारे स्वयंसेवक हे देखील या मेळाव्यात सहभागी झाले होते.

केंद्रशासनाच्या या 'राष्ट्रीय उल्लास मेला'प्रमाणेच राज्य स्तरावर उल्लास मेळाव्याचे आयोजन शिक्षण संचालनालय (योजना) तथा राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण व राज्य साक्षरता केंद्र, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचे मार्फत दोन दिवसांसाठी केले जात आहे. या राज्यस्तरीय उल्लास मेळाव्यासाठी प्रत्येक जिल्ह्यातील अधिकारी, असाक्षर, साक्षर, व त्यांना अध्यापन करणारे स्वयंसेवक सहभागी

होणार आहेत. या दोन दिवसीय उल्लास मेळाव्यात साहित्यांची स्टॉल मांडणी, नवसाक्षर व स्वयंसेवक यांची मनोगते व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे.

या राज्यस्तरीय उल्लास मेळाव्यातून प्रत्येक जिल्ह्यात उल्लास : नव भारत साक्षरता कार्यक्रमाच्या अनुषंगाने कोणकोणते नावीन्यपूर्ण उपक्रम चालू आहेत यांची देवाणघेवाण होणार आहे. निश्चितच या मेळाव्याच्या माध्यमातून राज्यातील असाक्षरांची नोंदणी वाढण्यास मदत होईल. तसेच येणाऱ्या असाक्षरांच्या परीक्षेसाठी जास्तीत जास्त असाक्षरांची नोंदणी वाढेल. या माध्यमातून राज्य १०० टक्के साक्षर करण्यासाठी आपण सर्व जण प्रयत्न करू.

MPalkar

**(डॉ. महेश पालकर)**
शिक्षण संचालक,
शिक्षण संचालनालय (योजना),
महाराष्ट्र राज्य, पुणे.

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १) | ‘उल्लास’ नव भारत साक्षरता कार्यक्रमाबाबत माहिती | १ |
| २) | राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण : उद्‌दिष्टे व कार्ये | ९ |
| ३) | राज्य साक्षरता केंद्र – कार्यक्रमाबाबतची उद्‌दिष्टे व कार्ये | १० |
| ४) | राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण व राज्य साक्षरता केंद्राची संरचना | १२ |
| ५) | राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण व राज्य साक्षरता केंद्राने वर्षभरात राबविलेले उपक्रम व कार्यक्रम | १३ |
| | ५.१) सर्व विभाग व जिल्हास्तरीय अधिकारी यांची राज्यस्तरीय कार्यशाळा (शिक्षण परिषद) | १३ |
| | ५.२) उल्लास ॲप प्रशिक्षण | १४ |
| | ५.३) ‘उल्लास मेला’ – नवी दिल्ली | १५ |
| | ५.४) उल्लास–नव भारत साक्षरता कार्यक्रम अंतर्गत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणीचे राज्यात आयोजन – दि. १७ मार्च, २०२४. | १८ |
| | ५.५) पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी निकाल | १९ |
| | अ) राज्य साक्षरता अभियान प्राधिकरणाने वर्षभरात राबविलेले उपक्रम व अंमलबजावणी कार्यक्रम | २० |
| | १) कार्यक्रम अंमलबजावणी आढावा बैठका | २० |
| | २) शिक्षण संचालनालय (योजना) यांचेमार्फत ‘वारी साक्षरतेची’ | २१ |
| | ३) श्रावणी सोमवार निमित्त ‘उल्लास–नव भारत साक्षरता’ कार्यक्रमाचा प्रचार–प्रसार | २३ |
| | ४) ‘उल्लास–नव भारत साक्षरता’ कार्यक्रमाचा गणेशोत्सवात प्रचार–प्रसार | २३ |
| | ५) शिक्षण संचालनालय (योजना) कार्यालयातर्फे साक्षरता सप्ताहाचे आयोजन | २७ |
| | ६) प्रसिद्‌धी व जनजागृती (आकाशवाणीच्या माध्यमातून प्रचार–प्रसार) | २९ |
| | ७) राज्य साक्षरता प्राधिकरणाकडून साहित्य विकसन | ३१ |

| अ. क्र. | | | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|
| | | ८) | शिक्षण संचालनालय (योजना) यांचेकडून महाराष्ट्र राज्यातील असाक्षर व्यक्ती नोंदणी संख्या उद्दिष्ट जिल्ह्यांना वितरण | ३२ |
| | | ९) | दि. २४ सप्टेंबर, २००५ पर्यंत उल्लास मोबाईल ॲपवर झालेल्या नोंदणीचा अहवाल | ३२ |
| | **ब)** | **राज्य साक्षरता केंद्राचे उपक्रम** | | ३४ |
| | | १) | अध्ययन अध्यापन व मूल्यमापनविषयक साहित्य विकसन | ३५ |
| | | २) | राज्यस्तरीय प्रशिक्षकांचे प्रशिक्षण (TOT) | ३७ |
| | | ३) | INFO-GRAPHICS, POSTER, FLYER निर्मिती कार्यशाळा | ३८ |
| | | ४) | प्रश्नपत्रिका भाषांतर कार्यशाळा | ४० |
| | | ५) | 'या दिवाळीला साक्षरतेची भेट देऊया, सर्वांचे जीवन समृद्ध करूया.' | ४२ |
| | | ६) | सराव प्रश्नपत्रिका व आदर्श उत्तरपत्रिका निर्मिती | ४४ |
| | | ७) | १७ मार्च २०२४ पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी (FLNAT) | ४५ |
| ६) | | | केंद्रपुरस्कृत उल्लास – नव भारत साक्षरता कार्यक्रम (NBSK) | ४८ |

# १. 'उल्लास' नव भारत साक्षरता कार्यक्रमाबाबत माहिती

**केंद्र पुरस्कृत 'नव भारत साक्षरता कार्यक्रम'**
**(New India Literacy Programme) योजनेची**
**अंमलबजावणी करण्याबाबत.**

## शासन निर्णय

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : नभासाका – ०३२२/प्र.क्र.३९/एस.डी. २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२
दिनांक : १४ ऑक्टोबर, २०२२.

**संदर्भ :** १) केंद्र शासनाचे अ.शा. पत्र क्रमांक ९–१/२०२२-NLMI, दि. २१.०२.२०२२
२) केंद्र शासनाचे अ.शा. पत्र क्रमांक ५–६/२०२०-NLM-II (part 2), दि. १४.०३.२०२२
३) केंद्र शासनाचे अ.शा. पत्र क्रमांक १–४/२०२२-NLM-४, दि. २४.०३.२०२२
४) केंद्रीय शालेय शिक्षण व साक्षरता विभागाकडून निर्गमित Road Map On implementation of NILP

**प्रस्तावना :**

सन २०११ च्या जनगणनेनुसार, देशातील १५ वर्षे आणि त्यावरील वयोगटातील निरक्षरांची संख्या २५.७६ कोटी आहे, त्यातील पुरुष ९.०८ कोटी आणि १६.६८ कोटी महिला आहेत. सन २००९–१० ते २०१७–१८ दरम्यान राबविण्यात आलेल्या साक्षर भारत कार्यक्रमांतर्गत ७.६४ कोटी एवढे साक्षर झालेल्या व्यक्तींच्या प्रगती अहवालाचा विचार करता, असा अंदाज आहे की सध्या देशात सुमारे १८.१२ कोटी लोक अजूनही निरक्षर आहेत.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये प्रौढ शिक्षण आणि निरंतर शिक्षण यासंबंधी उल्लेख करण्यात आला आहे, त्यातील परि. क्र. २१.४ मध्ये नमूद करण्यात आले आहे की, विशेषतः प्रौढ शिक्षणासाठी भक्कम आणि नावीन्यपूर्ण शासकीय उपक्रमांद्वारे तसेच समुदाय सहभाग आणि तंत्रज्ञानाचे सहज आणि फायदेशीर एकत्रीकरण केले जाईल. ज्यामुळे १०० टक्के साक्षरतेचे उद्दिष्ट लवकरात लवकर साध्य करणे शक्य होईल. प्रौढ शिक्षणावरील राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२० च्या या शिफारशींसह, संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास ध्येयांनुसार (SDG) सुद्धा २०३० पर्यंत सर्व तरुण आणि प्रौढ, पुरुष आणि स्त्रिया अशा सर्वांनी साक्षरता आणि संख्याज्ञान संपादन केले पाहिजे.

सबब, देशातील निरक्षरता दूर करणे आणि २०३० पर्यंत १०० टक्के साक्षरता प्राप्त करणे आवश्यक आहे. केंद्रीय अर्थसंकल्पीय भाषण २०२१–२२ (भाग–अ) मध्ये शिक्षणासंबंधी महत्त्वपूर्ण उपक्रमांचा उल्लेख आहे.

ज्यानुसार प्रौढ शिक्षणाच्या विस्तारासाठी संसाधनांचा पूर्ण क्षमतेने वापर करून व प्रौढ शिक्षणाचे ऑनलाइन प्रतिमान (Module) प्रस्तृत केले जाईल. प्रौढ शिक्षण योजनेच्या प्रभावीपणे अंमलबजावणीसाठी सर्वसमावेशक दिशा–निर्देश तयार करणे आणि योजनेची अंमलबजावणी त्वरीत सुरू करणे आवश्यक आहे. त्यानुसार, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने आणि २०२१–२२ च्या अर्थसंकल्पीय घोषणांच्या अनुषंगाने, प्रौढ शिक्षणाची एक नवीन योजना, 'नव भारत साक्षरता कार्यक्रम' सन २०२२–२३ ते २०२६–२७ या कालावधीत केंद्र शासनाच्या सूचनांनुसार राज्यात राबविण्याची वाव शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

केंद्र शासन पुरस्कृत ''नव भारत साक्षरता कार्यक्रम सन २०२२–२३ ते सन २०२६–२७ या कालावधीत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार रावविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

**योजनेचा उद्देश :**

१) देशातील १५ वर्षे आणि त्याहून अधिक वयोगटातील निरक्षर व्यक्तींमध्ये पायाभूत साक्षरता (वाचन, लेखन) व संख्याज्ञान विकसित करणे.

२) देशातील १५ वर्षे आणि त्यावरील वयोगटातील शिकाऊ व्यक्तींना महत्त्वपूर्ण जीवन कौशल्ये विकसित करणे. या कौशल्यांमध्ये आर्थिक साक्षरता, कायदेविषयक साक्षरता, डिजिटल साक्षरता, आपत्ती व्यवस्थापन कौशल्य, आरोग्याची काळजी व जागरूकता, बालसंगोपन आणि शिक्षण, कुटुंब कल्याण इ. बाबींचा समावेश आहे.

३) देशातील १५ वर्षे आणि त्यावरील वयोगटातील शिकाऊ व्यक्तींना मूलभूत शिक्षण देणे. यामध्ये समतुल्य पूर्वतयारी स्तर (इयत्ता तिसरी ते पाचवी), मध्य स्तर (इयत्ता सहावी ते आठवी) आणि माध्यमिक स्तर (इयत्ता नववी ते बारावी) असून सदर कार्यक्रम एनसीईआरटी/एससीईआरटी आणि NIOS/SIOS यांच्या सहकार्याने राबविण्यात येईल.

४) स्थानिक रोजगार, पुनर्कुशलता आणि उच्च कौशल्य प्राप्त करण्याच्या दृष्टिकोनातून प्रौढ नव–साक्षरांसाठी निरंतर शिकण्याच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणून देशातील १५ वर्षे आणि त्यावरील वयोगटातील विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक कौशल्ये विकसित करणे. त्याची अंमलबजावणी केंद्र आणि राज्य/केंद्रशासित प्रदेश स्तरावरील संबंधित मंत्रालये/विभागांच्या साहाय्याने केली जाईल.

५) देशातील १५ वर्षे आणि त्याहून अधिक वयोगटातील विद्यार्थ्यांना निरंतर शिक्षण देणे. ज्यामध्ये कला, विज्ञान, तंत्रज्ञान, संस्कृती, क्रीडा, मनोरंजन तसेच स्थानिकांना स्वारस्य असलेले विपय यांचा समावेश असेल. उच्च शिक्षण विभाग आणि केंद्र आणि राज्य/केंद्रशासित प्रदेश स्तरावरील इतर संबंधित मंत्रालय/विभागांच्या साहाय्याने निरंतर शिक्षणावरील उत्तम प्रतिचे आणि प्रगत साहित्य उपलब्ध करून देणे.

**योजनेचा कालावधी :**

सदर योजना १ एप्रिल, २०२२ ते ३१ मार्च, २०२७ या कालावधीत राबविण्यात येईल. या योजनेसाठीचा कालावधी पाच वर्षे (६० महिने) आहे.

## योजनेचे कार्यक्षेत्र :

ही योजना राज्ये/केंद्रशासित प्रदेशांतील सर्व जिल्ह्यांमधील ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागात लागू केली जाईल. तथापि, राज्य सरकार/केंद्रशासित प्रदेश योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार योजनेच्या अंमलबजावणीसाठी संबंधित जिल्ह्यांना/क्षेत्रांना प्राधान्य देईल. या योजनेत सर्व जिल्हे, उपजिल्हे, गट, शहर, ग्रामपंचायती, वार्ड आणि गावे समाविष्ट असू शकतील. थोडक्यात, १५ वर्षे व त्यावरील वयोगटातील निरक्षर असतील तेथे ही योजना लागू केली जाईल.

## योजनेची ठळक वैशिष्ट्ये :

i. 'प्रौढ शिक्षण' याऐवजी 'सर्वांसाठी शिक्षण' ही संज्ञा वापरली जाईल.

ii. 'शाळा' हे योजनेच्या अंमलबजावणीसाठी एकक (Unit) असेल.

iii. लाभार्थी आणि स्वयंसेवी शिक्षक यांचे सर्वेक्षण शाळांकडून केले जाईल.

iv. ज्या शालेय विद्यार्थ्यांच्या कुटुंबामध्ये निरक्षर व्यक्ती नाहीत अशा विद्यार्थ्यांना त्यांचे शेजारचे निरक्षरांना मदत करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येईल. शासकीय/अनुदानित/खाजगी शाळांमधील शिक्षकांव्यतिरिक्त शिक्षक पदाचे शिक्षण घेणारे/उच्च शिक्षण संस्थांमधील विद्यार्थी, पंचायत राज संस्था, अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्त्या तसेच NYKS, NSS आणि NCC यांचा देखील स्वयंसेवक म्हणून सहभाग असेल.

v. ऑनलाइन अध्यापन, शिक्षण आणि मूल्यमापन पद्धती (OTLAS) चा समावेश असेल.

vi. या योजनेचे पाच घटक आहेत. १) पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान २) महत्त्वपूर्ण जीवन कौशल्ये (Critical Life Skills) ३) व्यावसायिक कौशल्य विकास ४) मूलभूत शिक्षण आणि ५) निरंतर शिक्षण.

vii. सदर योजना स्वयंसेवी पद्धतीने सर्व राज्य व केंद्रशासित प्रदेशांमध्ये ग्रामीण व शहरी भागांमध्ये ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येईल. तथापि, स्वयंसेवकांसाठी प्रशिक्षण, कार्यशाळा यांचे आयोजन प्रत्यक्षरीत्या करता येईल.

viii. डिजिटल माध्यमे जसे की, टीव्ही, रेडिओ, मोबाईल फोन आधारित मोफत ओपन सोर्स ॲप्स/पोर्टल इ. द्वारे साहित्य आणि संसाधने उपलब्ध करून देण्यात येतील.

ix. प्रौढ शिक्षणासाठीचे शैक्षणिक धोरण NCERT अंतर्गत NCL या संस्थांकडून विकसित करण्यात येईल.

x. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्थेमध्ये एक राज्य साक्षरता केंद्र (SCL) असेल जे SLMAs ना तांत्रिक, शैक्षणिक व संसाधन विषयक साहाय्य पुरवेल.

xi. इतर पायाभूत सुविधा जसे शाळा आणि उच्च शिक्षण संस्था, कॉमन सर्व्हिस सेंटर्स (CSC), कम्युनिटी सेंटर्स इत्यादींचा उपयोग केला जाईल.

xii. स्थानिक परिस्थितीचा विचार करून राज्य व केंद्रशासित प्रदेशांनी जिल्हा स्तरावरील अंमलबजावणी यंत्रणा निर्माण करण्यात यावी. ज्यामध्ये राज्याचा शालेय शिक्षण विभाग, DIETS, BRCs, CRCs आणि इतर शासकीय विभाग/संस्थांचा समावेश असेल.

xiii. जिल्हा, तालुका व स्थानिक पातळीवर योजनेचे स्वरूप व अंमलबजावणी, नियोजन व संनियंत्रण यावी राज्य व केंद्रशासित प्रदेशांकडून ठरविण्याची मुभा असेल.

**प्रशासकीय संरचना :**

**अ) राष्ट्रीय स्तरावरील संरचना :**

राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरण (NLMA), शालेय शिक्षण आणि साक्षरता विभाग, शिक्षण मंत्रालय हे सदर योजना राष्ट्रीय स्तरावर राबविण्यासाठी जबाबदार असेल. ज्यामध्ये, (i) नियामक परिषद आणि (ii) कार्यकारी समिती या दोन संस्था असतील. या प्रत्येक संस्थेमध्ये २० – २५ सदस्य असतील. नियामक परिषदेचे अध्यक्ष शिक्षण मंत्री असतील, शिक्षण राज्यमंत्री उपाध्यक्ष असतील आणि सहसचिव (प्रौढ शिक्षण, SE&L) सदस्य सचिव असतील. समितीमध्ये इतर विभागांचे व संस्थांचे पदाधिकारी सदस्य असतील.

**ब) राज्य/केंद्रशासित प्रदेश स्तरावरील संरचना :**

१) राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण SLMA हे योजना राज्य/केंद्रशासित प्रदेश स्तरावर लागू करण्यासाठी जबाबदार असेल. ज्यामध्ये, (i) नियामक परिषद आणि (ii) कार्यकारी समिती या दोन संस्था असतील. या संस्थांमध्ये प्रत्येकी १५–२० सदस्य असतील. नियामक परिषदेचे अध्यक्ष संबंधित राज्याचे शिक्षण मंत्री असतील. SLMA ची संरचना व्यापकपणे NLMA च्या धर्तीवर असेल. SLMA च्या कार्यकारी समितीचे नेतृत्व राज्य/केंद्रशासित प्रदेशाचे शिक्षण विभागाचे सचिव करतील. SLMA ला तांत्रिक, शैक्षणिक आणि संसाधनात्मक साहाय्य प्रदान करण्यासाठी प्रत्येक संबंधित SCERT मध्ये एक राज्य साक्षरता केंद्र (SCL) असेल.

२) योजनेच्या राज्यस्तरीय अंमलबजावणीसाठी उपरोक्त १) मध्ये नमूद समित्यांच्या रचनेबाबत स्वतंत्र आदशे निर्गमित करण्यात येतील.

**क) जिल्हा आणि त्याखालील स्तरावरील संरचना :**

१) जिल्हा स्तरावरील अंमलबजावणीची रचना आणि धोरण संबंधित राज्य/केंद्रशासित प्रदेशांद्वारे स्थानिक परिस्थितीनुसार ठरविले व विकसित केले जाईल, ज्यामध्ये राज्य शिक्षण विभाग, DIETS, BRCS, CRCs आणि इतर शासकीय विभाग/संस्था यांचा समावेश असेल. राज्य/केंद्रशासित प्रदेश जिल्हा/तालुका/गट आणि स्थानिक संस्था पातळीवरील अंमलबजावणी घटकाची निश्चिती करेल.

२) योजनेच्या जिल्हा/गटस्तरीय अंमलबजावणीसाठी आवश्यक समित्यांच्या रचनेबाबत स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येतील.

**प्राधान्यक्रम लक्ष्यगट : साक्षरतेतील संपृक्तता (Saturation) :**

१) वय वर्षे १५ ते ३५ हा वयोगट प्रथमतः या अभियानात सामावून घेऊन त्यांना साक्षर करणे हे या अभियानाचे मुख्य लक्ष्य आहे. तदनंतर वय वर्षे ३५ व त्यापेक्षा अधिक वयोगटाचा विचार करण्यात येईल.

२) नव भारत साक्षरता कार्यक्रमासाठी श्रेणीप्रमाणे प्राधान्यक्रम :

अ) मुली आणि महिला

ब) अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/ इतर मागास प्रवर्ग/अल्पसंख्याक वर्ग

क) विशेष गरजा असणाऱ्या व्यक्ती/ दिव्यांग व्यक्ती (अक्षम व्यक्ती)

ड) अन्य वंचित घटक जसे उपेक्षित घटक/भटक्या व्यक्ती/बांधकाम कामगार/ मजूर वर्ग यांना लक्षणीय आणि तातडीने प्रौढ शिक्षणातून फायदा मिळू शकतो.

३) स्थान/क्षेत्र याप्रमाणे प्राधान्यक्रम :

अ) नीती आयोगाने घोषित केलेले महत्त्वाकांक्षी (Aspirational) जिल्हे

ब) राष्ट्रीय/राज्य सरासरी पेक्षा कमी साक्षरता दर असलेले जिल्हे

क) सन २०११ च्या जनगणनेप्रमाणे महिला साक्षरता दर ६० टक्क्यांपेक्षा कमी असलेले जिल्हे

ड) अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/अल्पसंख्याक यांची संख्या जास्त असलेले जिल्हे/गट

इ) शैक्षणिकदृष्ट्या मागास गट.

## योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपद्धती :

१) ही योजना स्वयंसेवकांच्या माध्यमातून राबविण्यात येणार आहे. या योजनेत साहाय्य करणारे/सहभागी असलेले स्वयंसेवक खऱ्या अर्थाने 'स्वयंसेवक' असतील आणि त्यांना योजनेअंतर्गत त्यांच्या सेवांसाठी कोणतेही वेतन/मासिक मानधन दिले जाणार नाही.

२) स्वयंसेवक इयत्ता पाचवी आणि त्यावरील शालेय विद्यार्थी असतील जे त्यांच्या स्वतःच्या कुटुंबातील अशिक्षित सदस्यांना शिक्षित होण्यासाठी मदत करतील. ज्या शालेय विद्यार्थ्यांच्या कुटुंबातील कोणीही निरक्षर नाही त्यांना सुद्धा प्रोत्साहन दिले जाईल. NCTE अंतर्गत TEIs (M.Ed./B.Ed. D.EL.Ed. / B.T.C/J.B.Tetc. अभ्यासक्रम) मधील सेवापूर्व विद्यार्थी दरवर्षी ३-४ निरक्षरांना शिकवतील, ज्यासाठी आराखडा (क्रेडिट फ्रेमवर्क) तयार केला जाईल. समाजातील विविध घटक जसे की, उच्च शिक्षण संस्था (HEIs), NYKS, NSS, NCC, CSOs चे स्वयंसेवक, समुदाय, गृहिणी, अंगणवाडी सेविका, शिक्षक, पंचायत राज संस्था आणि इतर संस्थांनाही प्रोत्साहन दिले जाईल. स्वयंसेवकांची ओळख पटवण्यासाठी विद्यांजली प्लॅटफॉर्मचाही वापर केला जाईल.

३) ही योजना ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येणार आहे. स्वयंसेवकांचे प्रशिक्षण, दिशानिर्देश (orientation), कार्यशाळा या बाबी प्रत्यक्षपणे (face-to-face mode) आयोजित केल्या जाऊ शकतील. सर्व साहित्य आणि संसाधने नोंदणीकृत स्वयंसेवकांना डिजिटल पद्धतीने सहज उपलब्ध असलेल्या डिजिटल मोड उदा., टीव्ही, रेडिओ, मोबाईल फोन-आधारित मोफत/ओपन-सोर्स ॲप्स/पोर्टल इ. द्वारे प्रदान केली जातील. विद्यमान ICT आणि शाळा आणि उच्चशिक्षण संस्थामधील इतर पायाभूत सुविधा, कॉमन सर्विस सेंटर्स (सीएससी), कम्युनिटी सेंटर्स इत्यादींचा वापर केला जाईल.

४) नव भारत साक्षरता कार्यक्रम २०२२-२७ अंतर्गत, UDISE अंतर्गत देशातील नोंदणीकृत सुमारे ११ लाख शाळांमधील ३ कोटी विद्यार्थ्यांसह शासकीय, अनुदानित आणि खाजगी शाळांमधील सुमारे ५० लाख शिक्षक तसेच शिक्षक प्रशिक्षण संस्था व उच्च शिक्षण संस्थांमधील सुमारे २० लाख विद्यार्थी यांचा सक्रिय सहभाग असेल. पंचायत राज संस्था, अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्त्या आणि अंदाजे ५० लाख आणि स्वयंसेवक देखील सहभागी होतील. योजनेमध्ये समुदाय सहभाग असेल, विद्यांजली पोर्टलच्या माध्यमातून लोकहितकारी/संस्थांचा ऐच्छिक सहभाग असेल. योजनेसाठी फेसबुक, ट्विटर, इंस्टाग्राम, व्हॉट्सअ‍ॅप, यूट्यूब, टिव्ही चॅनेल, रेडिओ इ. सारख्या समाजमाध्यमांचा व सर्व प्रकारची माध्यमे इलेक्ट्रॉनिक, प्रिंट, लोककथा इ. चा वापर केला जाईल.

५) योजनेच्या अंमलबजावणीसाठी शाळा हे एकक असेल.

६) योजनेंतर्गत लाभार्थी आणि स्वयंसेवी शिक्षक यांचे सर्वेक्षण राज्य/केंद्रशासित प्रदेशांच्या शाळांद्वारे मोबाईल अ‍ॅप/सर्वेक्षण अ‍ॅपद्वारे ऑनलाइन पद्धतीने केले जाईल.

७) कोणताही निरक्षर OTLAS द्वारे कोणत्याही ठिकाणी थेट नोंदणी करून योजनेचा लाभ मिळू शकतो आणि कोणताही स्वयंसेवी शिक्षक ऑनलाइन साक्षरता वर्ग किंवा प्रत्यक्ष एकास एक या सूत्रानुसार निरक्षरांना शिकवण्यासाठी आपली सेवा देऊ शकतो.

८) महत्त्वपूर्ण जीवन कौशल्ये आणि Online Teaching Learning and Assessment System (OTLAS ) च्या माध्यमातून १५ वर्षे व त्यावरील वयोगटातील सर्व निरक्षरांसाठी पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान विकसित करण्यात येईल.

९) योजनेच्या सुरळीत आणि प्रभावी अंमलबजावणीसाठी विविध मंत्रालये आणि विभागांसोवत सुसूत्रता साधण्यात येईल.

१०) ही योजना तंत्रज्ञानावर आधारित असेल आणि प्रामुख्याने ऑनलाइन पद्धतीने लागू जाईल. विविध प्रकारच्या डिजिटल माध्यमांद्वारे जसे की, टीव्ही, रेडिओ, सेल फोन आधारित मोफत/ओपन सोर्स अ‍ॅप्स/पोर्टल्स इ. द्वारे अभ्याक्रम/पाठ्यक्रम (content) डिजिटल पद्धतीने उपलब्ध करून देण्यात येईल.

११) राष्ट्रीय स्तरावर NCERT मध्ये एक समर्पित घटक संस्था नॅशनल सेंटर फॉर लिटरसी (NCL) आणि राज्य/केंद्रशासित प्रदेश स्तरावरील SCERT मध्ये राज्य साक्षरता केंद्र (SCL) निर्माण केले जाईल.

१२) वेगवेगळ्या वयोगटातील लोकांसाठी वेगवेगळी कार्यपद्धती अवलंबविण्यात येणार आहे. राज्ये/केंद्रशासित प्रदेशांना नावीन्यपूर्ण उपक्रम हाती घेण्यासाठी लवचिकता प्रदान केली जाईल. प्रौढ शिक्षणाच्या संधींचाही मोठ्या प्रमाणावर प्रसार-प्रचार केला जाईल.

१३) योजनेच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी आउटकम आउटपुट मॉनिटरिंग फ्रेमवर्क (OOMF) आणि ऑनलाइन MIS असेल. ऑनलाइन पद्धतीने राष्ट्रीय, राज्य, जिल्हा आणि शाळा स्तरावर प्रगतीचे निरीक्षण केले जाईल. शाळानिहाय UDISE प्रणालीवर नोंदणीकृत निरक्षरांच्या प्रगतीचे निरीक्षण केले जाईल.

१४) NIC द्वारे योजनेचे केंद्रीय पोर्टल विकसित केले जाईल ज्याद्वारे सुसज्ज एकत्रित माहिती (Data) जमा करण्यात येईल.

१५) बदलत्या परिस्थितीनुसार योजनेच्या सुधारणेसाठी आणि प्रगतीसाठी योग्य वाटल्यास योजनेच्या अंमलबजावणीमध्ये बदल करण्याच्या अनुषंगाने केंद्रीय शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागाकडून, केंद्रीय शिक्षण मंत्री यांच्या पूर्व परवानगीने, योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. यामध्ये राष्ट्रीय स्तरावर किंवा/ राज्य/केंद्रशासित प्रदेशांच्या स्तरावरील वदलांचा समावेश असू शकतो. तथापि, कोणत्याही आर्थिक पुनर्रचनेबाबतचा बदल केंद्रीय व्यय विभागाच्या पूर्व मान्यतेने करता येईल.

१६) निधीची उपलब्धता – या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी केंद्र हिस्सा ६० टक्के व राज्य हिस्सा ४० टक्के इतका असेल.

१७) केंद्र शासनाकडून सदर योजनेबाबत वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या मार्गदर्शक सूचनांनुसार/नुसार राज्यामध्ये सदर योजनेची अंमलबजावणी करण्यात येईल. नव भारत साक्षरता कार्यक्रम योजनेची यशस्वीपणे अंमलबजावणी करण्याची तसेच लोकशिक्षण केंद्रांचे आर्थिक व प्रशासकीय नियंत्रण, पर्यवेक्षण आणि संनियंत्रण याबाबतची जबाबदारी शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे व महाराष्ट्र राज्य नव भारत साक्षरता परिषदेची राहील.

या योजनेच्या कार्यान्वयासाठी केंद्र शासन/राष्ट्रीय साक्षरता मिशन यांनी दिलेल्या निदेशाचे अनुपालन करण्याची जबाबदारी शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे व संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (एससीईआरटी), महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा सांकेतांक २०२२१०१४१५१७००५२२१ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

IMTIAZ
MUSHTAQUE KAZI

**(इ. मु. काझी)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन.**

## केंद्र पुरस्कृत उल्लास-नव भारत साक्षरता कार्यक्रम शासन निर्णय

(१) शासन निर्णय दि. १४/१०/२०२२ नुसार महाराष्ट्र राज्याने केंद्र पुरस्कृत उल्लास-नव भारत साक्षरता कार्यक्रमाचा स्वीकार केला आहे.

(२) शासन निर्णय दि. २५/०१/२०२३ नुसार केंद्र पुरस्कृत उल्लास-नव भारत साक्षरता कार्यक्रम अंमलबजावणीसाठी नियामक परिषद व कार्यकारी समितींची (राज्य स्तर ते शाळा/गाव स्तर) स्थापना करण्यात आली आहे.

# २. राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण : उद्दिष्टे व कार्ये

**उद्दिष्टे व कार्ये :**

१) केंद्र पुरस्कृत 'उल्लास-नव भारत साक्षरता' कार्यक्रमाची राज्यभरात अंमलबजावणी करणे.

२) सन २०२२-२३ मधील ६,२०,००० असाक्षर व सन २०२३-२४ मधील ६,२०,००० असाक्षर व्यक्ती असे एकूण १२,४०,००० असाक्षर व्यक्तींना साक्षर करण्याचे निर्धारित उद्दिष्ट सन २०२३-२४ अखेर पर्यंत पूर्ण करणे.

३) 'उल्लास-नव भारत साक्षरता' कार्यक्रम राज्यात अंमलबजावणीसाठी आर्थिक व प्रशासकीय नियंत्रण ठेवणे.

४) क्षेत्रीय कार्यालयांना प्रशासकीय मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे.

५) असाक्षरांचे सर्वेक्षण पूर्ण करून घेणे.

६) राज्यातील कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचा नियमित आढावा घेणे.

७) कार्यक्रमाच्या राज्य स्तरावरील प्रचार-प्रसाराचा कार्यक्रम राबविणे.

८) केंद्र शासन व राज्य शासनाच्या सूचनेनुसार कामकाज करणे व कार्यक्रमाच्या सद्यःस्थितीचा अहवाल सादर करणे.

९) राज्य साक्षरता केंद्राशी समन्वय ठेवणे.

१०) असाक्षरांसाठी घेण्यात येणारी पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान चाचणीचे नियोजन करणे.

११) कार्यक्रम अंमलबजावणी कामकाज वार्षिक नियोजन तयार करणे.

१२) जिल्ह्यांना असाक्षर व्यक्ती उद्दिष्ट संख्या वितरित करणे.

१३) राज्य साक्षरता केंद्राने आयोजित केलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमांचे नियंत्रण करणे.

१४) केंद्रशासन व राज्यशासनाला कार्यक्रम अंमलबजावणीबाबत वेळोवेळी अहवाल सादर करणे.

१५) असाक्षरांसाठी घेण्यात येणारी पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान चाचणीचे नियोजन व नियंत्रण करणे.

१६) कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी प्राप्त निधी खर्चासाठी मार्गदर्शक सूचना तयार करणे.

१७) वार्षिक कार्यनियोजन व अंदाजपत्रक राज्यशासनाद्वारे केंद्रशासनास सादर करणे.

# ३. राज्य साक्षरता केंद्र - कार्यक्रमाबाबतची उद्दिष्टे व कार्ये

## उद्दिष्टे व कार्ये :

१) ‘उल्लास–नव भारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत’ स्वयंसेवकांना प्रशिक्षण देणे.

२) असाक्षरांसाठी व नवसाक्षरांसाठी अभ्यासक्रम विकसित करणे.

३) असाक्षरांच्या सर्वेक्षणासाठी मदत करणे.

४) लोकशिक्षण केंद्राचे आर्थिक व प्रशासकीय नियंत्रण, पर्यवेक्षण आणि सनियंत्रण यांबाबत सहकार्य करणे.

५) सन २०२२–२३ मधील ६,२०,००० असाक्षर व सन २०२३–२४ मधील ६,२०,००० असाक्षर व्यक्ती असे एकूण १२,४०,००० असाक्षर व्यक्तींना साक्षर करण्याचे निर्धारित उद्दिष्ट सन २०२३–२४ अखेर पर्यंत पूर्ण करणे.

६) स्वयंसेवकांना (विशेषतः शाळा/महाविद्यालय) अध्यापन करावयाचे वेळापत्रक निश्चित करणे.

७) असाक्षरांना साक्षर करावयाच्या अनुषंगाने राज्य/जिल्हा/तालुका स्तरांवर शिक्षकांसाठी विविध स्पर्धा आयोजित करणे.

८) स्वयंसेवकांच्या कामकाजाचे सुरुवातीपासून शेवटपर्यंत Tracking करून Assessment करणे.

९) असाक्षर व्यक्तींना स्वयंसेवक शिक्षकांनी कशा पद्धतीने अध्यापन करावे याबाबत प्रभावी प्रशिक्षण देणे.

१०) प्रशासकीय नियंत्रण, पर्यवेक्षण आणि सनियंत्रण यांबाबत सहकार्य करणे.

११) सराव प्रश्नपत्रिका तयार करणे व सरावासाठी उपलब्ध करून देणे.

१२) नवसाक्षरांसाठी तयार करण्यात आलेले साहित्य Online Mode मध्ये विविध माध्यमांतून उपलब्ध करून देणे.

१३) असाक्षर व्यक्तींना स्वयंसेवक शिक्षकांनी कशा पद्धतीने अध्यापन करावे याबाबत प्रभावी प्रशिक्षण देणे.

१४) NEP Task प्रमाणे कार्यवाही करणे.

१५) असाक्षरांच्या परीक्षेसाठी सहकार्य करणे.

१६) स्वयंसेवकांसाठी स्थानिक भाषांमधील छोटे–छोटे ऑनलाइन अभ्यासक्रम विकसित करणे.

१७) स्थानिक भाषेत चार्ट्स, खेळ, कोडे, लोकनृत्य, घोषवाक्ये इत्यादी साहित्यांचे शैक्षणिक माहिती संप्रेषण करणे.

१८) राज्यस्तरीय केस स्टडीचे दस्तऐवजीकरण करण्यासाठी 'डॉक्युमेंटेशन युनिट'ची स्थापना करणे, शिकण्याचे अनुभव, यशोगाथा यांच्या वार्षिक प्रदर्शनाचे आयोजन करणे.

१९) स्थानिक व बोलीभाषेत उल्लास साहित्य विकसिन करणे.

२०) नागरी संस्था, NGOs व शिक्षणक्षेत्रातील वरिष्ठ अधिकारी यांच्यातून प्रशिक्षक/स्वयंसेवक तयार करणे/मदत घेणे.

२१) गावागावांमध्ये सामाजिक चेतना केंद्र स्थापन करण्यासाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे.

२२) राज्य साक्षरता अभियान प्राधिकरणास शैक्षणिक सहकार्य करणे.

# ४. राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण व राज्य साक्षरता केंद्राची संरचना

## राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण संरचना :

| अ. क्र. | पदाचे नाव | मंजूर पदे | कार्यरत पदे | कार्यरत व्यक्तीचे नाव |
|---|---|---|---|---|
| १) | संचालक | १ | १ | डॉ. महेश पालकर |
| २) | सहसंचालक | १ | १ | श्रीम. अनिता कडू |
| ३) | उपसंचालक | १ | १ | श्री. राजेश क्षीरसागर |
| ४) | सहा. संचालक | १ | १ | श्री. किरण शिरोळकर |
| ५) | लेखाधिकारी | १ | १ | श्रीम. स्मिता राऊत |
| ६) | उपशिक्षणाधिकारी | १ | १ | श्री. रामदास वालझाडे |
| ७) | सहायक योजना अधिकारी | १ | १ | श्री. विराज खराटे |
| ८) | विस्तार अधिकारी (शिक्षण) | २ | २ | श्रीम. दैवशाला शिंदे<br>श्रीम. लीना भागवत |
| ९) | विषय सहायक | २ | २ | श्री. सुनील बासुतकर<br>श्री. महेंद्र बागडे |
| १०) | वरिष्ठ लिपिक | १ | १ | श्री. रमेश हेमाडे |
| ११) | कनिष्ठ लिपिक | १ | १ | श्री. देवेंद्र अभंगे |
| १२) | प्रोग्रामर | १ | १ | श्री. रोहित यादव |
| १३) | डेटा एन्ट्री ऑपरेटर | १ | १ | श्री. शशिकांत नकाते |

## राज्य साक्षरता केंद्राची संरचना :

| अ. क्र. | पदाचे नाव | मंजूर पदे | कार्यरत पदे | कार्यरत व्यक्तीचे नाव |
|---|---|---|---|---|
| १. | उपसंचालक | १ | १ | डॉ. माधुरी सावरकर |
| २. | वरिष्ठ अधिव्याख्याता | १ | १ | डॉ. गितांजली बोरुडे |
| ३. | अधिव्याख्याता | १ | १ | श्री. पंढरीनाथ जाधव |
| ४. | विस्तार अधिकारी | १ | ० | – |
| ५. | विषय सहायक | २ | २ | श्री. अण्णासाहेब कुटे<br>श्रीम. विनया भोसले |
| ६. | प्रोग्रामर | १ | ० | – |
| ७. | डेटा एन्ट्री ऑपरेटर | १ | ० | – |

# ५. राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण व राज्य साक्षरता केंद्राने वर्षभरात राबविलेले उपक्रम व कार्यक्रम

## ५.१. सर्व विभाग व जिल्हास्तरीय अधिकारी यांची राज्यस्तरीय कार्यशाळा (शिक्षण परिषद)

- **उपक्रमाची उद्दिष्टे :**

१) सर्व पर्यवेक्षीय यंत्रणा यांना 'उल्लास–नव भारत साक्षरता' कार्यक्रम याविषयी स्वत:ची भूमिका निश्चित करणे.

२) 'उल्लास–नव भारत साक्षरता' कार्यक्रमाविषयी सर्वंकष माहिती देणे.

३) या कार्यक्रमात सर्व पर्यवेक्षीय यंत्रणेचा सहभाग वाढविणे.

४) 'उल्लास–नव भारत साक्षरता' कार्यक्रमाच्या अनुषंगाने सर्वेक्षण व नोंदणी वाढविण्यासाठी प्रयत्न करणे.

- **उपक्रमाच्या कार्यवाहीचे स्वरूप :**

१) दि. १६ व १७ ऑक्टोबर, २०२३ या कालावधीत राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

२) या कार्यशाळेत मंत्री महोदय व सर्व अधिकारी, प्राथमिक/माध्यमिक शिक्षणाधिकारी, प्राचार्य, पर्यवेक्षीय यंत्रणा यांची उपस्थिती होती.

३) कार्यशाळेतून 'उल्लास–नव भारत साक्षरता' कार्यक्रमाची माहिती व जबाबदारी देण्यात आली.

४) या कार्यशाळेत असाक्षर सर्वेक्षण व नोंदणी याबद्दल माहिती देण्यात आली.

- **उपक्रमाचा सांख्यिकीय तपशील :**

| अ. क्र. | उपक्रमाचे नाव | स्तर | उपक्रमाचा कालावधी | सहभागी घटक/ लाभार्थी | सहभागी |
|---|---|---|---|---|---|
| १. | राज्यस्तरीय शिक्षण परिषद | राज्य स्तर | दि. १६ व १७ ऑक्टोबर, २०२३ | मंत्री महोदय, अधिकारी व पर्यवेक्षीय यंत्रणा | ३५० |

- **उपक्रमाची फलनिष्पत्ती :**

१) सर्व पर्यवेक्षीय यंत्रणा यांनी आपल्या अधिनस्त शिक्षकांकडून सर्वेक्षण व नोंदणीचे कामकाज सुरू केले.

२) उल्लास ॲपवर असाक्षर व स्वयंसेवक यांची नोंदणी वाढण्यास सुरुवात झाली.

- **उपक्रमाचे फोटो :**







## ५.२. उल्लास ॲप प्रशिक्षण

- **उपक्रमाची उद्दिष्टे :**

१) स्वयंसेवक व शिक्षक यांना उल्लास मोबाइल ॲपबद्दल माहिती देणे.

२) उल्लास ॲपवर असाक्षरांची व स्वयंसेवकांची माहिती भरणे.

- **उपक्रमाच्या कार्यवाहीचे स्वरूप :**

१) केंद्रपुरस्कृत 'उल्लास–नव भारत साक्षरता कार्यक्रमासाठी' विकसित करण्यात आलेल्या ULLAS मोबाईल ॲपचे उजळणी प्रशिक्षण राज्यातील सर्व क्षेत्रीय अधिकारी यांच्यासाठी दि. २ जून, २०२३ रोजी ऑनलाईन पद्धतीने यूट्यूब लाईव्हद्वारे घेण्यात आले.

२) सदर प्रशिक्षणाचा दुसरा टप्पा दि. ७ सप्टेंबर, २०२३ रोजी घेण्यात आला.

- **उपक्रमाचा सांख्यिकीय तपशील :**

| अ. क्र. | उपक्रमाचे नाव | स्तर | उपक्रमाचा कालावधी | सहभागी घटक/ लाभार्थी | सहभागी |
|---|---|---|---|---|---|
| १) | उल्लास ॲप प्रशिक्षण | राज्य स्तर | २ जून, २०२३ | राज्यातील सर्व पर्यवेक्षीय यंत्रणा | यूट्यूब लाईव्हद्वारे |
| २) | उल्लास ॲप प्रशिक्षण | राज्य स्तर | ७ सप्टेंबर, २०२३<br>७ ऑगस्ट, २०२४ | राज्यातील सर्व पर्यवेक्षीय यंत्रणा | यूट्यूब लाईव्हद्वारे<br>७१,८१७ |

- **उपक्रमाची फलनिष्पत्ती :**

१) दि. १७ मार्च, २०२४ पर्यंत उल्लास ॲपवर एकूण ६,४१,८१६ असाक्षरांची नोंदणी झाली.

२) सदर प्रशिक्षणामुळे जास्तीत जास्त असाक्षर परीक्षेस बसवण्यास मदत झाली.

- **उपक्रमाचे फोटो :**




## ५.३. 'उल्लास मेला' – नवी दिल्ली

- **उपक्रमाची उद्दिष्टे :**

१) राष्ट्रीय स्तरावरील उल्लास मेळाव्यात सहभागी होणे.

२) राज्याने विकसित केलेल्या उल्लास साहित्याची मांडणी करणे.

३) 'उल्लास–नव भारत साक्षरता कार्यक्रमावर' आधारित सांस्कृतिक कार्यक्रम सादर करणे.

४) असाक्षर, नवसाक्षर, स्वयंसेवक यांचे मनोगत घेणे.

५) उल्लास मेळाव्यासाठी उल्लास साहित्यांची रंगीत छपाई करणे. (५ प्रती)

- **उपक्रमाच्या कार्यवाहीचे स्वरूप :**

१) राष्ट्रीय स्तरावर उल्लास मेळाव्याचे आयोजन दि. ६ व ७ फेब्रुवारी, २०२४ रोजी बालभवन, नवी दिल्ली येथे करण्यात आले होते.

२) राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण येथील दोन अधिकारी, राज्य साक्षरता केंद्रातील २ अधिकारी, राज्यातील एक नवसाक्षर व त्यांना शिकवणारे स्वयंसेवक आणि सांस्कृतिक कार्यक्रम सादर करणारा संघ उल्लास मेळाव्यात सहभागी झाले होते.

३) मेळाव्यामध्ये राज्य साक्षरता अभियान प्राधिकरणामार्फत स्टॉल लावण्यात आला होता.

४) राज्य साक्षरता अभियान प्राधिकरणाने तयार केलेले साहित्य प्रदर्शित करण्यात आले.

५) महाराष्ट्र राज्यातर्फे साक्षरतेवर आधारित पोवाडा सादर करण्यात आला.

६) प्रमुख अतिथींना राज्यातर्फे दोन फोटो भेट देण्यात आले. महाराष्ट्र राज्याने दिलेले हे दोन्ही फोटो केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या गॅलरीमध्ये प्रदर्शित करण्यात आले आहेत, तसेच मंत्रालयाने ते ट्विटर हँडलवरून ट्विटही केले आहेत.

७) तसेच राज्य साक्षरता केंद्रामार्फत तयार करण्यात आलेल्या उल्लास प्रवेशिका संक्षिप्त याचे प्रकाशन मा. केंद्रीय शिक्षण मंत्री यांच्या हस्ते इतर राज्यांच्या संक्षिप्त प्रवेशिकांसोबत करण्यात आले आहे.

- **उपक्रमाचा सांख्यिकीय तपशील :**

| अ. क्र. | उपक्रमाचे नाव | स्तर | उपक्रमाचा कालावधी | सहभागी घटक/ लाभार्थी | सहभागी |
|---|---|---|---|---|---|
| १) | 'उल्लास मेला', नवी दिल्ली | राष्ट्रीय | ०६ व ०७ फेब्रुवारी, २०२४ | अधिकारी वर्ग, असाक्षर व स्वयंसेवक | २० |

- **उपक्रमाची फलनिष्पत्ती :**

१) राष्ट्रीय स्तरावर 'उल्लास मेला' याचे आयोजन दि. ६ व ७ फेब्रुवारी, २०२४ रोजी बालभवन, नवी दिल्ली येथे सहभाग घेतला.

२) मेळाव्यामध्ये राज्य साक्षरता केंद्रामार्फत लावण्यात आलेल्या स्टॉलची पाहणी मंत्री महोदयांनी केली.

३) राज्य साक्षरता केंद्राने तयार केलेले साहित्य प्रदर्शित करण्यात आले.

४) महाराष्ट्र राज्यातर्फे साक्षरतेवर आधारित पोवाडा सादर करण्यात आला.

५) प्रमुख अतिथींना राज्यातर्फे दोन फोटो भेट देण्यात आले. महाराष्ट्र राज्याने दिलेले हे दोनही फोटो केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या गॅलरीमध्ये प्रदर्शित करण्यात आले आहे, तसेच मंत्रालयाने ते ट्विटही केले आहेत.

६) तसेच राज्य साक्षरता केंद्रामार्फत तयार करण्यात आलेल्या उल्लास प्रवेशिका संक्षिप्त याचे प्रकाशन मा. केंद्रीय शिक्षण मंत्री यांच्या हस्ते इतर राज्यांच्या संक्षिप्त प्रवेशिकांसोबत करण्यात आले आहे.

- **उपक्रमाचे फोटो :**











बारामतीच्या आजीची बहात्तरीतही शिकण्याची दुर्दम्य इच्छा!

## आजी-नातीच्या 'त्या' फोटोची शिक्षण मंत्रालयाकडून दखल

लोकमत न्यूज नेटवर्क

**बारामती :** बारामती येथील ७२ वर्षीय सुशीला क्षीरसागर आपल्या नातीकडून नुकत्याच सुरू झालेल्या नवभारत साक्षरता अभियानानिमित्त अक्षरे गिरवू लागल्या आहेत.

क्षीरसागर आजींचे लहानपणी शाळेत नाव दाखल करण्यात आले होते. मात्र, दारिद्र्यामुळे आणि दोन लहान भावंडांचा सांभाळ करण्यासाठी लगेचच शाळा सोडून द्यावी लागल्याने त्यांच्यावर निरक्षर राहण्याची वेळ आली. सध्या त्या मणक्याच्या आजाराने त्रस्त आहेत. त्यानंतरदेखील शिकण्याची दुर्दम्य इच्छा त्यांच्यात आहे. त्यांच्या नातीकडून त्या साक्षर होण्याचा प्रयत्न करीत आहेत.

या दोघींच्या शिक्षणाचे धडे गिरवितानाच्या छायाचित्राची केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने दखल घेतली आहे. केंद्रीय सचिव संजय कुमार आणि अवर सचिव प्रदीप हेडाऊ यांनी याची प्रशंसा करीत नवभारत साक्षरता कार्यक्रमाच्या 'उल्लास' या फेसबुक पेजवर हे छायाचित्र पोस्टही केले आहे.

देशभरात मागील वर्षापासून नव भारत साक्षरता अभियान 'सर्वासाठी शिक्षण' या नावाने सुरू झाले आहे. महाराष्ट्रात त्याची सुरुवात चालू वर्षी ८ सप्टेंबर रोजी जागतिक साक्षरता दिनी करण्यात आली. पंधरा वर्षे व त्याहून अधिक वयाच्या निरक्षरांच्या साक्षरतेसाठी सन २०२७ पर्यंत कालबद्ध कार्यक्रम केंद्र शासनाने राज्यांच्या मदतीने राबवणे सुरू केले आहे. मागील वर्षी महाराष्ट्रात हा कार्यक्रम विविध कारणामुळे राबवण्यात आला नव्हता.

केंद्र शासनाने 'शाळा' हे एकक ठरवून स्वयंसेवकांच्या मदतीने प्रौढ निरक्षरांना साक्षर करण्यासाठी नवभारत साक्षरता कार्यक्रम सुरू केला आहे. महाराष्ट्रात सन २०११ च्या जनगणनेनुसार एक कोटी ६३ लाख निरक्षर आहेत. चालू वर्षी राज्याला मागील वर्षीच्या उद्दिष्टांसह बारा लाख चाळीस हजार निरक्षरांना साक्षर करण्याचे उद्दिष्ट मिळाले आहे.

या बाबतच्या सविस्तर सूचना योजना शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी दिल्या आहेत. त्यानुसार राज्यभर गावोगावी साक्षरतेचे वर्ग कमी-अधिक संख्येने सुरू झाले आहेत. त्यापूर्वीच सुशीला आजींचे मूलभूत शिक्षण त्यांची नात रुचिता हिने सुरू केले.

### निरक्षरांसाठी प्रेरणादायी

सुशीला यांना त्यांच्या माहेरी जबाबदारी व दारिद्र्यामुळे त्यांना शाळा सोडून द्यावी लागली होती. त्यामुळे अतिशय काबाडकष्ट करून त्यांनी आपल्या दोन्ही मुलांना उच्च शिक्षित केले आणि घराला दारिद्र्यातून बाहेर काढले. नातीचा आणि त्यांचा शिकतानाचा नकळत फोटो ज्योती क्षीरसागर यांनी घेतला. त्यांचा हा निरक्षरांसाठी प्रेरणादायी फोटो सोशल मीडिया व इतर माध्यमातून महाराष्ट्रात चांगलाच व्हायरल झाला आहे.



TODAY पुणे, शुक्रवार, ९ फेब्रुवारी २०२४ सकाळ ५

# ‘उल्लास’मध्ये महाराष्ट्राचा सहभाग ठरला लक्षवेधी

असाक्षर व नवसाक्षरांसाठी दिल्लीत राष्ट्रीय मेळावा; हिंदी भाषेमधून पोवाडा सादर

‘असाक्षरांच्या चेहऱ्यावर हसू येऊ द्या’



# अनन्याची कलाकृती शिक्षणमंत्र्यांना भेट

‘उल्लास’चा राष्ट्रीय मेळावा; आजी-आजोबांना शिकवतानाचे स्केच

सकाळ वृत्तसेवा

नवी दिल्ली : नव भारत साक्षरता कार्यक्रमात रत्नागिरीच्या अनन्या चव्हाण हिने कॅनव्हासवर केलेले पेंटिंग केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान भेट देण्यात आले.

## ५.४. उल्लास-नव भारत साक्षरता कार्यक्रम अंतर्गत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणीचे राज्यात आयोजन - दि. १७ मार्च, २०२४.



## ५.५. पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी निकाल

| तपशील मुद्दा | | उल्लास ॲपवर नोंदणी झालेली असाक्षरांची संख्या (दि. १५/०३/२०२४ अखेर) | परीक्षा दिलेल्या असाक्षरांची संख्या | उत्तीर्ण नवसाक्षर संख्या | सुधारणा आवश्यक (Need Improvement असा शेरा नमूद असलेली असाक्षर संख्या | शेकडा उत्तीर्ण निकाल | सुधारणा आवश्यक असलेल्या निकालाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| लिंगनिहाय | पुरुष (M) | १८८६२८ | १३९५८२ | १३०२२९ | ९३५३ | ९३.३० | ६.७० |
| | स्त्रिया (F) | ४५३०५९ | ३१९९४५ | २९५६७१ | २४२७४ | ९२.४१ | ७.५९ |
| | तृतीयपंथी (T) | १३१ | ६ | ६ | ० | १००.०० | ०.०० |
| | **एकूण** | **६४१८१६** | **४५९५३३** | **४२५९०६** | **३३६२७** | **९२.६८** | **७.३२** |
| वयोगटनिहाय | १५ ते ३५ वर्षे | ११३११० | ८०६१६ | ७७६३४ | २९८२ | ९६.३० | ३.७० |
| | ३६ ते ६५ वर्षे | ३८६१८२ | २७२९८७ | २५१७५४ | २१२३३ | ९२.२२ | ७.७८ |
| | ६६ ते व त्यापुढील वर्षे | १४२५२६ | १०५९३० | ९६५१८ | ९४१२ | ९१.११ | ८.८९ |
| | **एकूण** | **६४१८१६** | **४५९५३३** | **४२५९०६** | **३३६२७** | **९२.६८** | **७.३२** |
| जात प्रवर्गनिहाय | जनरल | १०६८८२ | ८९४५२ | ८५८२४ | ३६२८ | ९५.९४ | ४.०६ |
| | एस.सी. | ८६३१४ | ६४०७२ | ५९४७९ | ४५९३ | ९२.८३ | ७.१७ |
| | एस.टी. | २००९६० | १४०५२७ | १२७५६४ | १२९६३ | ९०.७८ | ९.२२ |
| | ओबीसी | २२६५३३ | १४९४२७ | १३७६६८ | ११७५९ | ९२.१३ | ७.८७ |
| | अल्पसंख्याक | २११३१ | १६०५५ | १५३७१ | ६८४ | ९५.७४ | ४.२६ |
| महाराष्ट्र राज्य एकूण | | **६४१८१६** | **४५९५३३** | **४२५९०६** | **३३६२७** | **९२.६८** | **७.३२** |


राज्यातील सव्वाचार लाख निरक्षर झाले साक्षर
नवभारत साक्षरता कार्यक्रमामुळे निरक्षरांचे साक्षर होण्याचे स्वप्न झाले पूर्ण
८० वर्षीय व्यक्ती सुद्धा साक्षर


असाक्षरतेचा कलंक पुसला, आम्ही मिरवणार साक्षरतेचे बिरुद

## अ) राज्य साक्षरता अभियान प्राधिकरणाने वर्षभरात राबविलेले उपक्रम व अंमलबजावणी कार्यक्रम

### १) कार्यक्रम अंमलबजावणी आढावा बैठका :

- **उपक्रमाचे स्वरूप :**

  'उल्लास–नव भारत साक्षरता' कार्यक्रम अंमलबजावणी आढावा संदर्भाने ऑनलाईन बैठका घेण्यात आल्या.

  १) सन २०२२ पासून 'उल्लास–नव भारत साक्षरता कार्यक्रमास' सुरुवात; राज्यात प्रत्यक्ष कार्यवाही सन २०२३ पासून.

  २) कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी सन २०२३–२४ मध्ये राज्य स्तरावरून V.C. टप्पा १ ते ५ चे आयोजन व सन २०२४–२५ मध्ये अद्यापपर्यंत V.C. टप्पा १ ते ३.

- **उपक्रमाची परिणामकता :**

  **सन २०२३–२४ नोंदणी** :

  १) V.C. टप्पा १ ते ५ **आयोजनापूर्वी** दि. २३/१०/२०२३ रोजी असाक्षर नोंदणी संख्या : **२७,०२९.**

  २) V.C. टप्पा १ ते ५ **आयोजनानंतर** दि. १३/०३/२०२४ अखेर असाक्षर नोंदणी संख्या : **६,२१,३२७.**

  **सन २०२४–२५ नोंदणी**

  १) V.C. टप्पा १ ते ३ **आयोजनानंतर** दि. २६/०९/२०२४ अखेर नोंदणी संख्या : **२,३१,०३४.**

- **उपक्रमाचे फोटो :**





*असाक्षरांचे सर्वेक्षण, नोंदणी व अध्ययन-अध्यापनाबाबत पुणे जिल्हास्तरीय अधिकारी यांची आढावा बैठक घेताना शिक्षण संचालनालय (योजना) चे संचालक डॉ. महेश पालकर*

## २) शिक्षण संचालनालय (योजना) यांचेमार्फत 'वारी साक्षरतेची' :

- **उपक्रमाचे स्वरूप :**

दि. २८ जुलै, २०२४ ते १७ जुलै, २०२४ या कालावधीत श्री क्षेत्र देहू व आळंदी तसेच महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातील संताच्या पालख्या आषाढी वारीसाठी सहभाग दोन व्हॅन व स्वयंसेवक/शिक्षकांच्या पथकाद्वारे साक्षरता रथ तयार करण्यात आला.

आळंदी ते पंढरपूर व देहू ते पंढरपूर पालखी मार्गादरम्यान पथनाट्य सादरीकरण, घडीपत्रिका वाटप, साक्षरता आधारित गीतगायन व विहित नमुन्यात पालखी मार्गावरील शाळांतील शिक्षक, विद्यार्थी व प्रशासकीय यंत्रणा यांच्या साहाय्याने वारीत सहभागी, असाक्षर व्यक्तींची नोंदणी इ. उपक्रम आयोजन करण्यात आले.

**एकूण असाक्षर नोंदणी संख्या : १०७६१**

- **उपक्रमाची परिणामकारकता :**

'वारी साक्षरतेची' अंतर्गत पालखी मुक्कामाच्या ठिकाणी भरलेले नोंदणी फॉर्म संकलन व जिल्हानिहाय याद्या तयार करण्यात आल्या. सदरील याद्या संबंधित जिल्हा शिक्षणाधिकारी (योजना) यांना देऊन असाक्षर व स्वयंसेवक यांची उल्लास ॲपवर नोंदणी व जोडणी करणे. नोंदणीकृत असाक्षरांना शिकविणे व FLNAT परीक्षेला प्रविष्ट करून, साक्षरता प्रमाणपत्र प्राप्त करण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

- **उपक्रमाचे फोटो :**









## नऊ वर्षांच्या चिमुकलीकडून साक्षरतेचा जागर

### केंद्र आणि राज्य सरकारने घेतली दखल

बारामती, दि. १२ (प्रतिनिधी)- बारामती येथील रुचिता क्षीरसागर ही नऊ वर्षीय चिमुकली गायनातून साक्षरतेचा प्रचार करत आहे. तिचा व्हिडिओ केंद्र शासनाने उल्लास या फेसबुक पेजवर पोस्ट केला आहे. ७२ वर्षीय निरक्षर सुशीला आजी हिला शिकवतानाच्या तिच्या प्रेरणादायी छायाचित्राची यापूर्वी केंद्र व राज्यानेही प्रशंसा केली होती. राज्याचे योजना शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी बारामती येथे दोघींचा गौरव केला.

चालू वर्षी ८ सप्टेंबर या जागतिक साक्षरता दिनी महाराष्ट्रात नवभारत साक्षरता अभियानाची सुरुवात करण्यात आली. निरक्षर आणि स्वयंसेवकांसाठी या दोघी आजी नातीचे या छायाचित्र प्रेरणादायी ठरत आहे. त्यांचे मूळगाव टोणेवाडी (ता. बार्शी) असून तीन वर्षांपूर्वी ते बारामतीत स्थलांतरित झाले आहेत. सुशीला आजी मणक्याच्या आजाराने त्रस्त आहे. त्यांचा साक्षरता वर्ग नातीने घरीच सुरू केला आहे. रुचिता हिने आजीला शिकविण्याबरोबरच 'हम मिल जुलकर लिखते पढते जाएँगे' या हिंदी गीतातून सावित्रीबाईंच्या वेशात साक्षरतेचा जागर सुरू केला आहे. तिचा स्तुत्य उपक्रम देशभर पोहोचावा म्हणून केंद्राने नवभारत साक्षरतेच्या उल्हास फेसबुक पेजवर तिचा हा व्हिडिओ प्रशंसा करीत पोस्ट केला.

योजना शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी बारामती येथे त्यांच्या घरी भेट देऊन आजी-नातीचा गौरव केला. यावेळी माजी शिक्षणाधिकारी पोपट काळे, राजेश क्षीरसागर, ज्योती क्षीरसागर, आबा जगताप, गौरव माने, सारिका माने, विठ्ठल साळवे उपस्थित होते. रुचिता ही अनेकांत इंग्लिश मीडियम स्कूल बारामतीमध्ये तिसरीत शिकत असून तिला संगीत शिक्षिका जयश्री कुलकर्णी, सुवर्णा जमदाडे यांचे मार्गदर्शन मिळत आहे.

"नवभारत साक्षरता अभियानात शाळांनी सर्व्हे करून स्वयंसेवकांच्या मदतीने निरक्षरांना साक्षर करावयाचे आहे. घरातील असाक्षरांना त्यांच्या कुटुंबीयांनी साक्षर करणे अभिप्रेत आहे. कुटुंबात निरक्षर नसतील तर शेजारी असलेल्यांनाही साक्षर करता येऊ शकते. प्रौढ असाक्षरांनी योजनेत सहभागी होऊन स्वतचा उत्कर्ष साधावा आणि राष्ट्रकार्यास मदत करावी
-डॉ. महेश पालकर, शिक्षण संचालक (योजना), पुणे.

## ३) श्रावणी सोमवार निमित्त 'उल्लास-नव भारत साक्षरता' कार्यक्रमाचा प्रचार-प्रसार :

- **उपक्रमाचे स्वरूप :**

केंद्र पुरस्कृत 'उल्लास-नव भारत साक्षरता' कार्यक्रमाचा श्रावणी सोमवार निमित्त प्रचार-प्रसार करण्यात आला, त्यावेळी विविध जिल्ह्यांनी सक्रिय सहभाग घेतला.

- **उपक्रमाचे फोटो :**




## ४) 'उल्लास-नव भारत साक्षरता' कार्यक्रमाचा गणेशोत्सवात प्रचार-प्रसार :

- **उपक्रमाचे स्वरूप :**

केंद्र पुरस्कृत 'उल्लास-नव भारत साक्षरता' कार्यक्रमाचा गणेशोत्सवामध्ये प्रचार-प्रसार करण्यासाठी राज्यातील सर्व जिल्ह्यांचे पालकमंत्री, सर्व जिल्हाधिकारी, धर्मादाय आयुक्त यांना पत्र देण्यात आले.

आर्थिक साक्षरता, कायदेविषयक साक्षरता, डिजिटल साक्षरता, आपत्ती व्यवस्थापन कौशल्य, आरोग्य, बालसंगोपन, कुटुंबकल्याण इत्यादींचा समावेश करून, गणेशोत्सव, नवरात्र आणि सर्व सार्वजनिक उत्सवांमध्ये सदर कार्यक्रमाचा प्रचार-प्रसार व जनजागृती करण्यासाठी ऑडिओ/व्हिडिओ क्लिपची निर्मिती करण्यात आली. या निमित्ताने प्रचार-प्रसारासाठी पुढील साहित्य उपलब्ध करून देण्यात आले.

१) उल्लास नव भारत साक्षरता कार्यक्रम (हिंदी ध्वनिचित्रफीत) लिंक

https://shorturl.at/d2Er2

२) उल्लास नव भारत साक्षरता कार्यक्रमाची माहिती व आवाहन (मराठी ऑडिओ) क्लिप लिंक https://rb.gy/17r34o

३) उल्लास नव भारत साक्षरता कार्यक्रम घोषवाक्ये (मराठी ऑडिओ क्लिप) लिंक https://rb.gy/4alvs7

**गणेशोत्सव ७ ते १७ सप्टेंबर, २०२४ व नवरात्र उत्सव दि. ३ ते १२ ऑक्टोबर, २०२४ दरम्यान घेतलेले उपक्रम :**

- जिल्ह्यात होणाऱ्या बैठका व विविध कार्यक्रमांमध्ये 'उल्लास-नव भारत साक्षरता' कार्यक्रमाचा प्रचार-प्रसार करण्यासाठी राज्यातील सर्व पालकमंत्री महोदयांना पत्राद्वारे विनंती करण्यात आली.
- विविध गणेश मंडळे व नवरात्र उत्सव मंडळे यांच्याद्वारे 'उल्लास-नव भारत साक्षरता ' कार्यक्रमावर आधारित बॅनर लावण्यात आले.
- मतदान प्रक्रिया, आपत्ती व्यवस्थापन, आर्थिक साक्षरता ऑनलाइन बँकिंग व डिजिटल साक्षरता, दैनंदिन जीवनातील गणित, प्रवास व वाहतूकविषयक नियम, दैनंदिन जीवनात उपयोगी पडणारे विविध ॲप्स यांचे देखावे तयार करण्यात आले.
- 'उल्लास-नव भारत साक्षरता कार्यक्रमावर' आधारित विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या.
- गणेशोत्सवामध्ये नवसाक्षरांचा सन्मान करण्यात आला.

उपरोक्तप्रमाणेच नवरात्र उत्सवातही 'उल्लास-नव भारत साक्षरता कार्यक्रमाचा' प्रचार-प्रसार करण्यासाठी महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हाधिकारी तसेच १) कोल्हापूरची महालक्ष्मी २) तुळजापूरची भवानीमाता ३) माहूरची रेणुकामाता व वणीची सप्तश्रृंगी या साडेतीन शक्तिपीठांच्या अध्यक्षांना कळविण्यात आले आहे.

- **उपक्रमाची परिणामकारकता :**

  उल्लास नव भारत साक्षरता कार्यक्रमाचा मोठ्या प्रमाणात प्रचार-प्रसार व जनजागृती झाली.

- ## उपक्रमाचे फोटो :



*केंद्र पुरस्कृत 'उल्लास–नव भारत साक्षरता' या कार्यक्रमाचा गणेशोत्सवामध्ये प्रचार–प्रसार करण्यासाठी* ***सौ. कल्पना महेंद्र बागडे (रा. कुंजीरवाडी, ता. हवेली. जि. पुणे)*** *यांनी घरच्या गणपतीपुढे वित्तीय साक्षरता, डिजिटल साक्षरता, आपत्ती व्यवस्थापन, मतदान जागृती, वारी साक्षरतेची, विविध Apps या थीमवर आधारित देखावा केला होता. देखाव्यातील रेल्वेला* ***नवसाक्षर एक्स्प्रेस,*** *ATM ला NBSK व लॅपटॉपला 'ULLAS' हे नाव देण्यात आले होते.*



*केंद्र पुरस्कृत उल्लास–नव भारत साक्षरता कार्यक्रमाचा गणेशोत्सवामध्ये प्रचार–प्रसार करण्यासाठी* ***श्री. संभाजी देशमुख (प्राथमिक शिक्षक, जि.प. केंद्र शाळा हुमगाव ता. जावळी जि. सातारा)*** *यांनी असाक्षर व स्वयंसेवक यांचा देखावा केला होता.*

## गणेशोत्सवामध्ये 'उल्लास-नव भारत साक्षरता कार्यक्रमाचा' प्रचार-प्रसार करण्यासाठी पुण्यातील विविध गणेश मंडळांना भेटी



## 'उल्लास-नव भारत साक्षरता कार्यक्रम' - प्रौढ असाक्षरांना अध्यापन





## ५) शिक्षण संचालनालय (योजना) कार्यालयातर्फे साक्षरता सप्ताहाचे आयोजन :



*शालेय शिक्षण व साक्षरता विभाग, शिक्षण मंत्रालय, भारत सरकार आयोजित भोपाळ (मध्य प्रदेश) येथील 'उल्लास-नव भारत साक्षरता' कार्यक्रम क्षेत्रीय संमेलनात महाराष्ट्राचा सहभाग.*



*मा. अर्चना अवस्थी (सहसचिव, शालेय शिक्षण व साक्षरता विभाग, शिक्षण मंत्रालय, भारत सरकार) महाराष्ट्र राज्याची शैक्षणिक साहित्य निर्मिती पाहणी करताना.*




*जागतिक साक्षरता दिनानिमित्त शालेय शिक्षण व साक्षरता विभाग, शिक्षण मंत्रालय, नवी दिल्ली आयोजित साक्षरता परिषदेसाठी महाराष्ट्राची उपस्थित टीम.*

*साक्षरता परिषद नवी दिल्ली येथे 'महाराष्ट्रातील असाक्षरांचे शिक्षण' याविषयी मनोगत व्यक्त करताना श्रीम. अंकिता शिवतरे, स्वयंसेविका ता. भोर, जि. पुणे.*








## ६) प्रसिद्धी व जनजागृती (आकाशवाणीच्या माध्यमातून प्रचार-प्रसार) :



*महाराष्ट्र राज्य शिक्षण संचालनालय (योजना) चे संचालक **डॉ. महेश पालकर,** उपसंचालक **राजेश क्षीरसागर** तसेच राज्य साक्षरता केंद्राच्या **डॉ. गितांजली बोरुडे** यांच्याशी **वैशाली जाधव** यांनी साधलेला संवाद.*



*कु. अनन्या चव्हाण, रत्नागिरी हिने उल्लास- नव भारत साक्षरता या विषयावर कॅनव्हासवर साकारलेले पेंटींग*

**शिक्षण संचालनालय (योजना). महाराष्ट्र, पुणे यांचेकडून**
**गणेशोत्सव/नवरात्रोत्सवात मंडळांना पुढील उपक्रम करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**

| अ. क्र. | उपक्रमाचे नाव | विषय / थीम |
|---|---|---|
| १) | बॅनर लावणे | १.१) 'उल्लास-नव भारत साक्षरता' कार्यक्रमाचे बॅनर लावणे. |
| २) | देखावे बनविणे | २.१) प्रत्यक्ष मतदानाची प्रक्रिया<br>२.२) आपत्ती व्यवस्थापन<br>२.३) आर्थिक साक्षरता<br>२.४) (बँक/पोस्ट/एटीएम/ऑनलाइन बँकिंग) बाबत माहिती/डिजिटल साक्षरता<br>२.५) दैनंदिन जीवनातील गणित<br>२.६) प्रवास व वाहतूकविषयक नियम<br>२.७) दैनंदिन जीवनात उपयोगी पडणारे विविध ॲप (उदा. फोन पे/गुगल पे/Land reports/दिनदर्शिका ॲप/विविध बँकिंग ॲप्स/एलआयसी ॲप) |
| ३) | उल्लास-नव भारत साक्षरता कार्यक्रमावर आधारित विविध स्पर्धा | ३.१) वक्तृत्व स्पर्धा<br>३.२) चित्रकला स्पर्धा<br>३.३) रांगोळी स्पर्धा<br>३.४) वादविवाद स्पर्धा<br>३.५) गीतगायन स्पर्धा<br>३.६) सामान्यज्ञान स्पर्धा<br>३.७) कथाकथन स्पर्धा |
| ४) | असाक्षरांना साक्षर करणे | ४.१) गणेश मंडळांनी आपल्या परिसरातील ५० ते १०० असाक्षरांना शाळांच्या सहकार्याने साक्षर करणे, मंडळ सदस्यांनी स्वयंसेवक म्हणून काम करणे. |
| ५) | नवसाक्षरांचा सन्मान घडीपत्रकांचे वाटप करणे | ५.१) सन २०२३-२४ मध्ये उत्तीर्ण झालेल्या नवसाक्षरांचा सत्कार/सन्मान करणे.<br>५.२) नवसाक्षरांच्या मुलाखतींचे/मनोगतांचे आयोजन करणे. उल्लास-नव भारत साक्षरता कार्यक्रम घडीपत्रिकांचे (माहितीपत्रकांचे वाटप करणे. |

## ७) राज्य साक्षरता प्राधिकरणाकडून साहित्य विकसन :

- **उपक्रमाचे स्वरूप :**

१) पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी मार्गदर्शिका :


गोपनीय
फक्त कार्यालयीन उपयोगासाठी
महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (योजना),
महाराष्ट्र राज्य,पुणे
Email- * directorscheme.mh@gmail.com *sclmah@maa.ac.in
जन जन साक्षर उल्लास ULLAS साक्षरतेकडून समृद्धीकडे
उल्लास नव भारत साक्षरता कार्यक्रम
पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान चाचणी
रविवार दिनांक-१७ मार्च २०२४
क्षेत्रीय अधिकारी व परीक्षा केंद्र संचालकांसाठी
सूचना पुस्तिका
राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण (SLMA)
तथा शिक्षण संचालनालय (योजना) महाराष्ट्र राज्य पुणे १७ ,डॉ.आंबेडकर मार्ग ,पुणे-४११००१
व
राज्य साक्षरता केंद्र ,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद , महाराष्ट्र ,पुणे -४११०३०

२) उल्लास – नव भारत साक्षरता कार्यक्रम हस्तपुस्तिका :


शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शिक्षण संचालनालय (योजना)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१
उल्लास - नव भारत साक्षरता कार्यक्रम
ULLAS –NAV BHARAT SAKSHARATA KARYAKRAM
हस्तपुस्तिका

## ८) शिक्षण संचालनालय (योजना) यांचेकडून महाराष्ट्र राज्यातील असाक्षर व्यक्ती नोंदणी संख्या उद्दिष्ट जिल्ह्यांना वितरण :

- सन २०११ च्या जनगणनेनुसार राज्यात १ कोटी, ६३ लाख इतक्या असाक्षर व्यक्ती आहेत. सदर कार्यक्रम सन २०२२ ते सन २०२७ पर्यंत सुरू राहणार आहे.
- सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ पर्यंत १२,४०,००० इतके उद्दिष्ट राज्यासाठी निश्चित करण्यात आले आहे.
- राज्य स्तरावरून जिल्ह्यांना उद्दिष्ट (असाक्षर व्यक्ती संख्या) वितरण करण्यात आले आहे.
- जिल्हा स्तरावरून तालुक्यांना व तालुका स्तरावरून गावांना असाक्षर उद्दिष्ट (असाक्षर व्यक्ती संख्या) वितरण करण्यात आले आहे.

## ९) दि. २४ सप्टेंबर, २००५ पर्यंत उल्लास मोबाईल ॲपवर झालेल्या नोंदणीचा अहवाल :

**Survey Progress Report - All Registrations Financial Year - 2023-2024**

State : Maharashtra

| Sr. No. | District Name | Total Learners | Tagged Learners | Untagged Learners | Total VTs | Tagged VTs | Untagged VTs |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1) | Ahmednagar | 14,389 | 10,139 | 4,250 | 7,085 | 6,060 | 1,025 |
| 2) | Akola | 25,101 | 21,963 | 3,138 | 3,432 | 3,130 | 302 |
| 3) | Amravati | 32,387 | 22,233 | 10,154 | 4,243 | 3,515 | 728 |
| 4) | Aurangabad | 17,206 | 12,309 | 4,897 | 2,706 | 2,159 | 547 |
| 5) | Bhandara | 9,128 | 8,630 | 498 | 1,130 | 1,072 | 58 |
| 6) | Bid | 12,819 | 6,590 | 6,229 | 1,991 | 1,547 | 444 |
| 7) | Buldana | 15,069 | 11,020 | 4,049 | 2,888 | 2,359 | 529 |
| 8) | Chandrapur | 39,387 | 26,915 | 12,472 | 5,074 | 4,409 | 665 |
| 9) | Dhule | 10,852 | 9,833 | 1,019 | 1,474 | 1,395 | 79 |
| 10) | Gadchiroli | 63,461 | 25,812 | 37,649 | 3,792 | 2,780 | 1,012 |
| 11) | Gondiya | 9,718 | 6,539 | 3,179 | 2,034 | 1,616 | 418 |
| 12) | Hingoli | 12,259 | 8,229 | 4,030 | 1,258 | 995 | 263 |
| 13) | Jalgaon | 71,863 | 49,568 | 22,295 | 6,626 | 5,729 | 897 |

| Sr. No. | District Name | Total Learners | Tagged Learners | Untagged Learners | Total VTs | Tagged VTs | Untagged VTs |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 14) | Jalna | 15,695 | 11,975 | 3,720 | 2,530 | 2,190 | 340 |
| 15) | Kolhapur | 2,866 | 1,606 | 1,260 | 1,218 | 882 | 336 |
| 16) | Latur | 4,734 | 2,004 | 2,730 | 843 | 622 | 221 |
| 17) | Mumbai II | 4,980 | 3,628 | 1,352 | 4,074 | 2,525 | 1,549 |
| 18) | Mumbai (Subarban) | 15,339 | 12,964 | 2,375 | 8,493 | 7,168 | 1,325 |
| 19) | Nagpur | 12,450 | 8,733 | 3,717 | 2,047 | 1,458 | 589 |
| 20) | Nanded | 22,232 | 11,299 | 10,933 | 2,465 | 1,717 | 748 |
| 21) | Nandurbar | 32,627 | 21,133 | 11,494 | 2,652 | 2,226 | 426 |
| 22) | Nashik | 35,266 | 21,957 | 13,309 | 5,248 | 4,319 | 929 |
| 23) | Osmanabad | 5,769 | 4,107 | 1,662 | 1,194 | 919 | 275 |
| 24) | Palghar | 17,190 | 12,207 | 4,983 | 2,472 | 2,054 | 418 |
| 25) | Parbhani | 21,120 | 10,051 | 11,069 | 1,592 | 1,141 | 451 |
| 26) | Pune | 12,684 | 8,370 | 4,314 | 5,107 | 3,927 | 1,180 |
| 27) | Raigarh | 10,215 | 8,205 | 2,010 | 2,507 | 2,333 | 174 |
| 28) | Ratnagiri | 15,547 | 14,096 | 1,451 | 6,898 | 6,472 | 426 |
| 29) | Sangli | 8,167 | 6,713 | 1,454 | 4,319 | 3,934 | 385 |
| 30) | Satara | 5,651 | 3,198 | 2,453 | 1,532 | 1,195 | 337 |
| 31) | Sindhudurg | 306 | 125 | 181 | 72 | 72 | 20 |
| 32) | Solapur | 22,884 | 15,244 | 7,640 | 3,753 | 2,991 | 762 |
| 33) | Thane | 24,657 | 17,376 | 7,281 | 4,382 | 3,664 | 718 |
| 34) | Wardha | 1,888 | 888 | 1,000 | 480 | 316 | 164 |
| 35) | Washim | 20,778 | 9,193 | 11,585 | 1,350 | 1,067 | 283 |
| 36) | Yavatmal | 15,989 | 8,762 | 7,227 | 2,312 | 1,820 | 492 |
| | **Grand Total** | **6,62,673** | **0** | **0** | **1,11,273** | **0** | **0** |

URL : https://nilp.education.gov.in/nilp/

## ब) राज्य साक्षरता केंद्राचे उपक्रम

### अ) Budgeted :

| अ. क्र. | उपक्रमाचे नाव | स्तर | आर्थिक साहाय्य |
|---|---|---|---|
| १) | अध्ययन अध्यापन व मूल्यमापनविषयक साहित्य विकसन | असाक्षर व्यक्तींसाठी | शिक्षण संचालनालय (योजना) |
| २) | राज्यस्तरीय प्रशिक्षकांचे प्रशिक्षण (TOT) | राज्यातील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतील एक अधिकारी व दोन साधनव्यक्ती | CNCL, NCERT नवी दिल्ली |
| ३) | INFO GRAPHICS, POSTER, FLYER व अध्ययन निष्पत्ती कार्यशाळा | असाक्षर | शिक्षण संचालनालय (योजना) |
| ४) | 'उल्लास मेला' नवी दिल्ली | असाक्षर | शिक्षण संचालनालय (योजना) |
| ५) | प्रश्नपत्रिका भाषांतर कार्यशाळा | असाक्षर | शिक्षण संचालनालय (योजना) |

### ब) Non-Budgeted :

| अ. क्र. | उपक्रमाचे नाव | स्तर | आर्थिक साहाय्य |
|---|---|---|---|
| ६) | उल्लास App प्रशिक्षण – यूट्यूब लाईव्ह | राज्यातील सर्व पर्यवेक्षीय यंत्रणा | विना अर्थसाहाय्य |
| ७) | ''या दिवाळीला साक्षरतेची भेट देऊया, सर्वांचे जीवन समृद्ध करूया.'' | इयत्ता सहावी ते आठवी व नववी ते दहावीतील विद्यार्थी | विना अर्थसाहाय्य |
| ८) | राज्य स्तर शिक्षण परिषद १६ व १७ ऑक्टोबर, २०२३ | राज्यातील डायट प्राचार्य, शिक्षणाधिकारी (प्राथ/माध्य/योजना) | शिक्षण संचालनालय (योजना) |
| ९) | सराव प्रश्नपत्रिका व आदर्श उत्तरपत्रिका निर्मिती | राज्य साक्षरता केंद्रातील अधिकारी व विषय सहायक | विना अर्थसाहाय्य |

## १) उपक्रमाचे नाव : अध्ययन अध्यापन व मूल्यमापनविषयक साहित्य विकसन

- **उपक्रमाची उद्दिष्टे :**

१) असाक्षरांसाठी अभ्यासक्रम विकसित करणे.

२) उल्लास नव भारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत स्वयंसेवकांसाठी मार्गदर्शिका तयार करणे.

३) प्रश्नपत्रिका, कृतिपत्रिका, मूल्यमापन पत्रिका, प्रश्नपेढी तयार करणे.

४) विकसित करण्यात आलेले साहित्य दीक्षा, उल्लास व एससीईआरटीच्या वेबसाईटवर देणे.

- **उपक्रमाच्या कार्यवाहीचे स्वरूप :**

१) राज्य साक्षरता केंद्रामार्फत व डायट, वर्धा व धुळे यांच्या सहकार्याने विविध १३ थीमवर आधारित साहित्य विकसित करण्यात आले आहे.

२) जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वर्धा व धुळे यांच्या सहकार्याने साहित्य विकसनासाठी एकूण ०७ कार्यशाळा घेण्यात आल्या.

३) या ०७ कार्यशाळांतून अंतिम उल्लास साहित्य तयार करण्यात आले. यामध्ये उल्लास ०१ ते ०४, उल्लास स्वयंसेवक मार्गदर्शिका, उल्लास संक्षिप्त प्रवेशिका, उल्लास संक्षिप्त मार्गदर्शिका, प्रश्नपत्रिका, प्रश्नपेढी, मूल्यांकन पत्रिका, कृतिपत्रिका, चला जाऊया गोष्टींच्या गावा... इ. विकसित केलेले साहित्य दीक्षा, उल्लास व एससीईआरटीच्या वेबसाईटवर देण्यात आले आहे.

- **उपक्रमाचा सांख्यिकीय तपशील :**

| अ. क्र. | उपक्रमाचे नाव | स्तर | उपक्रमाचा कालावधी | सहभागी घटक/लाभार्थी |
|---|---|---|---|---|
| १) | साहित्य विकसन कार्यशाळा | राज्य स्तर (शिक्षक) | २१ ऑगस्ट ते २४ ऑगस्ट, २०२३ | तज्ज्ञ डायट अधिकारी, ससाधनव्यक्ती व शिक्षक |
| २) | साहित्य विकसन कार्यशाळा | राज्य स्तर (शिक्षक) | ०४ सप्टेंबर ते ०८ सप्टेंबर, २०२३ | तज्ज्ञ डायट अधिकारी, ससाधनव्यक्ती व शिक्षक |
| ३) | साहित्य विकसन कार्यशाळा | राज्य स्तर (शिक्षक) | २३ ऑक्टोबर ते २५ ऑक्टोबर, २०२३ | तज्ज्ञ डायट अधिकारी, साधनव्यक्ती व शिक्षक |

- **उपक्रमाची फलनिष्पत्ती :**

१) एकूण १२ प्रकारचे साहित्य तयार झाले.

२) वरील साहित्य असाक्षर तसेच स्वयंसेवक यांच्यासाठी मार्गदर्शक म्हणून उपयोगात आले.

३) सर्व विकसित केलेले साहित्य DIKSHA, ULLAS, SCERT च्या वेबसाईटवर देण्यात आले आहे व असाक्षरांसाठी ऑनलाइन मोडमध्ये उपलब्ध झाले.

- उपक्रमाचे फोटो


उल्लास प्रवेशिका
उल्लास प्रश्नपेढी
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
राज्य साक्षरता केंद्र, महाराष्ट्र, पुणे
राज्य साक्षरता केंद्र (SCL), SCERT मार्फत विकसित सात प्रकारचे उल्लास अध्ययन साहित्य (TLM)
उल्लास स्वयंसेवकांसाठी मार्गदर्शिका
उल्लास प्रश्नपत्रिका
उल्लास कृतिपत्रिका
चला जाऊया गोष्टींच्या गावा
उल्लास मूल्यांकन कृतिपत्रिका


कुटुंब आणि शेजार
डिजिटल साक्षरता
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
राज्य साक्षरता केंद्र, महाराष्ट्र, पुणे
संवाद
वित्तीय साक्षरता
आमची संस्कृती
राज्य साक्षरता केंद्र (SCL), SCERT मार्फत विकसित साहित्य १३ घटक
मनोरंजन
प्रवास
आमच्या आजूबाजूला
वेळेबाबत संवाद
आहार आणि आरोग्य
मतदान
कायदेविषयक माहिती
आपत्तींचे प्रकार व स्वरूप

## २) उपक्रमाचे नाव : राज्यस्तरीय प्रशिक्षकांचे प्रशिक्षण (TOT)

- **उपक्रमाची उद्दिष्टे :**

१) नव भारत साक्षरता कार्यक्रमाची ओळख करून देणे.

२) नव भारत साक्षरता कार्यक्रमातील अभ्यासक्रमाची ओळख करून देणे.

३) सर्वेक्षण व उल्लास ॲपवर नोंदणी या संदर्भातील तांत्रिक माहिती देणे.

- **उपक्रमाच्या कार्यवाहीचे स्वरूप :**

१) राज्यस्तरीय तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा CNCL, NCERT, नवी दिल्ली यांच्या सौजन्याने दि. १३ ते १५ सप्टेंबर, २०२३ या कालावधीत (पुणे व नागपूर) या दोन केंद्रावर घेण्यात आली.

२) प्रशिक्षणात जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतील एक अधिकारी व दोन विषय साधनव्यक्ती असे प्रत्येक जिल्ह्यातून ३ प्रशिक्षणार्थी यांना निमंत्रित करण्यात आले होते. सदर प्रशिक्षणासाठी एकूण १०८ प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

३) उल्लास साहित्य – उल्लास प्रवेशिका भाग १ ते भाग ४ व स्वयंसेवक मार्गदर्शिका यांच्या १२५ प्रती व इतर साहित्याच्या ५ प्रती छपाई करून घेण्यात आल्या.

४) प्रत्येक जिल्ह्यासाठी उल्लास मसुदा साहित्याची १ प्रत देण्यात आली. (उल्लास प्रवेशिका भाग १ ते भाग ४ व स्वयंसेवक मार्गदर्शिका)

५) राज्यस्तरीय प्रशिक्षणानंतर जिल्हा स्तर ते शाळा स्तर शिक्षक व स्वयंसेवक यांना टप्प्या–टप्प्याने प्रशिक्षण देण्यात आले.

६) एकंदरीत राज्यातील सर्व शिक्षक व स्वयंसेवक यांना नव भारत साक्षरता कार्यक्रमाविषयी प्रशिक्षण देण्यात आले.

- **उपक्रमाचा सांख्यिकीय तपशील :**

| अ. क्र. | उपक्रमाचे नाव | स्तर | उपक्रमाचा कालावधी | सहभागी घटक/ लाभार्थी |
|---|---|---|---|---|
| १) | राज्यस्तरीय प्रशिक्षकांचे प्रशिक्षण (TOT) , पुणे व नागपूर | राज्य स्तर (शिक्षक) | १३ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर, २०२३ | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतील एक अधिकारी व दोन साधनव्यक्ती |
| २) | उल्लास साहित्य मसुदा प्रतींची छपाई | – | – | – |
| ३) | जिल्हा स्तर ते शाळा स्तर शिक्षक व स्वयंसेवक प्रशिक्षण | जिल्हा स्तर ते शाळा स्तर | सप्टेंबर ते डिसेंबर, २०२३ | शिक्षक व गावातील स्वयंसेवक |

- **उपक्रमाची फलनिष्पत्ती :**

१) सर्व शिक्षकांना उल्लास नव भारत साक्षरता कार्यक्रमाची ओळख झाली.

२) उल्लास नव भारत साक्षरता कार्यक्रमातील अभ्यासक्रमाची माहिती मिळाली.

३) स्वयंसेवकांना स्वतःची भूमिका समजण्यास मदत झाली.

४) उल्लास ॲपवर नवसाक्षरांची नोंदणी करण्यात आली.

५) साक्षरता वर्ग सुरू होण्यासाठी मदत झाली.

- **उपक्रमाचे फोटो :**



### ३) उपक्रमाचे नाव : INFO-GRAPHICS, POSTER, FLYER निर्मिती कार्यशाळा

- **उपक्रमाची उद्दिष्टे :**

१) CNCL, NCERT नवी दिल्लीच्या धर्तीवर INFO-GRAPHICS, POSTER, FLYER तयार करणे.

२) INFO-GRAPHICS, POSTER, FLYER तयार करून त्यांचा प्रचार व प्रसार करणे.

३) CNCL, NCERT नवी दिल्ली या ठिकाणी आयोजित 'उल्लास मेला' मध्ये प्रदर्शित करणे.

४) विकसित करण्यात आलेले INFO-GRAPHICS, POSTER, FLYER व अध्ययन निष्पत्ती DIKSHA, CNCL, SCERT व उल्लास ॲपवर अपलोड करणे.

- **उपक्रमाच्या कार्यवाहीचे स्वरूप :**

१) CNCL, NCERT नवी दिल्ली यांनी उल्लास – नव भारत साक्षरता कार्यक्रमावर आधारित तयार केलेल्या साहित्याप्रमाणे राज्य साक्षरता केंद्रामार्फत दि.१७ जानेवारी २०२४ व १८ जानेवारी २०२४ या दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

२) या कार्यशाळेत एकूण १० शिक्षकांनी सहभाग घेतला. त्यांनी CNCL, NCERT नवी दिल्ली यांच्या धर्तीवर उल्लास साहित्यावर आधारित INFO-GRAPHICS, POSTER, FLYER व भाषा आणि गणित विषयाच्या अध्ययन निष्पत्ती मराठी भाषेत भाषांतरित करण्यात आल्या.

- **उपक्रमाचा सांख्यिकीय तपशील :**

| अ. क्र. | उपक्रमाचे नाव | स्तर | उपक्रमाचा कालावधी | सहभागी घटक/ लाभार्थी |
|---|---|---|---|---|
| १) | INFO-GRAPHICS, POSTER, FLYER व अध्ययन निष्पत्ती निर्मिती कार्यशाळा | राज्य स्तर (शिक्षक) | १७ जानेवारी ते १८ जानेवारी २०२४ | शिक्षक |

- **उपक्रमाची फलनिष्पत्ती :**

१) CNCL, NCERT नवी दिल्ली यांच्या उल्लास साहित्यावर आधारित INFO-GRAPHICS, POSTER, FLYER व भाषा आणि गणित विषयाच्या अध्ययन निष्पत्ती (भाषांतरीत) तयार करण्यात आल्या.

२) INFO-GRAPHICS, POSTER, FLYER व भाषा आणि गणित विषयांच्या अध्ययन निष्पत्ती DIKSHA, CNCL, NCERT नवी दिल्ली, SCERT पुणे यांच्या Website वर Upload करण्यासाठी देण्यात आल्या.

३) तयार केलेले साहित्य 'उल्लास मेला' नवी दिल्ली येथील मेळाव्यात प्रदर्शित करण्यात आले.

- **उपक्रमाचे फोटो :**






## ४) उपक्रमाचे नाव : प्रश्नपत्रिका भाषांतर कार्यशाळा

- **उपक्रमाची उद्‌दिष्टे :**

  १) दि.१७ मार्च, २०२४ रोजी असाक्षरांसाठी होणाऱ्या परीक्षेसाठी CNCL, NCERT नवी दिल्ली यांनी पाठवलेल्या २ इंग्रजी व २ हिंदी प्रश्नपत्रिकांचे मराठी भाषांतर करणे.

  २) शिक्षण निरीक्षक, मुंबई यांच्या साहाय्याने मराठी भाषेतील प्रश्नपत्रिकेचे इतर ८ भाषांत भाषांतर करणे.

- **उपक्रमाच्या कार्यवाहीचे स्वरूप :**

  १) राज्य साक्षरता केंद्रातील अधिकारी व विषय सहायक यांनी CNCL, NCERT नवी दिल्ली यांनी पाठवलेल्या २ इंग्रजी व २ हिंदी प्रश्नपत्रिकांचे मराठी भाषांतर केले.

  २) प्रश्नपत्रिकांचे भाषांतर करताना येणाऱ्या तांत्रिक बाबींसाठी २ तज्ज्ञ व्यक्तींची कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

  ३) दि.११ मार्च, २०२४ व १२ मार्च, २०२४ या दोन दिवसीय कार्यशाळेत त्यांना या प्रश्नपत्रिकांचे स्वरूप व गोपनीयता सांगण्यात आली.

४) या तज्ज्ञ व्यक्तींनी मराठीत भाषांतर केलेल्या प्रश्नपत्रिकांची पडताळणी करण्यात आली.

५) तयार केलेल्या प्रश्नपत्रिका शिक्षण संचालनालय (योजना) कार्यालय यांना गोपनीय रीतीने पाठवण्यात आल्या.

६) प्रश्नपत्रिकांचे इतर ८ भाषांत भाषांतर करण्यासाठी शिक्षण निरीक्षक, मुंबई व भाषांतर करणारे २ तज्ज्ञ शिक्षक यांची ऑनलाइन कार्यशाळा राज्य साक्षरता कक्ष व शिक्षण संचालनालय (योजना) कार्यालय यांच्यामार्फत घेण्यात आली.

७) शिक्षण निरीक्षक, मुंबई यांच्या साहाय्याने इतर ८ भाषांत भाषांतरित प्रश्नपत्रिका तयार करण्यात आल्या.

८) या सर्व भाषांतरीत प्रश्नपत्रिका गोपनीय पद्धतीने शिक्षण संचालनालय (योजना) कार्यालय यांना पाठवण्यात आल्या.

- **उपक्रमाचा सांख्यिकीय तपशील :**

| अ. क्र. | उपक्रमाचे नाव | स्तर | उपक्रमाचा कालावधी | सहभागी घटक/लाभार्थी |
|---|---|---|---|---|
| १) | प्रश्नपत्रिका भाषांतर कार्यशाळा | राज्य स्तर | ११ मार्च व १२ मार्च २०२४ | राज्य साक्षरता केंद्रातील अधिकारी व तज्ज्ञ शिक्षक |
| २) | Online Workshop | राज्य स्तर | १२ मार्च ते १५ मार्च २०२४ | राज्य साक्षरता केंद्रातील अधिकारी व तज्ज्ञ शिक्षक |

- **उपक्रमाची फलनिष्पत्ती :**

१) मराठी भाषेतील व इतर ०८ भाषांतील प्रश्नपत्रिका अचूक तयार करण्यात आली.

२) दि. १७ मार्च, २०२४ रोजी झालेल्या असाक्षरांच्या परीक्षेसाठी या ४ प्रश्नपत्रिकांतील १ प्रश्नपत्रिका वापरण्यात आली.

- **उपक्रमाचे फोटो :**



## ५) उपक्रमाचे नाव : 'या दिवाळीला साक्षरतेची भेट देऊया, सर्वांचे जीवन समृद्ध करूया.'

- **उपक्रमाची उद्दिष्टे :**

१) राज्य साक्षरता केंद्रामार्फत राज्यातील शाळांना दिवाळी सुट्टीच्या वेळेचा सदुपयोग करून विद्यार्थ्यांमार्फत 'या दिवाळीला साक्षरतेची भेट देऊया, सर्वांचे जीवन समृद्ध करूया.' हा उपक्रम सर्व माध्यमांच्या, सर्व व्यवस्थापनांच्या शाळा व अध्यापक विद्यालयांमध्ये राबविणे.

२) दिवाळीच्या सुट्टीत विद्यार्थ्यांच्या माध्यमातून नव साक्षरता अभियानाची अंमलबजावणी करणे.

३) घरातील व शेजारील असाक्षरांना सुट्टीच्या कालावधीत विद्यार्थ्यांच्या माध्यमातून शिकते करणे.

- **उपक्रमाच्या कार्यवाहीचे स्वरूप :**

१) राज्य साक्षरता केंद्रामार्फत सर्व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था आणि अध्यापक विद्यालय यांना या उपक्रमाबद्दल पत्र देण्यात आले.

२) सर्व व्यवस्थापनाच्या, सर्व माध्यमाच्या युडायस क्रमांक प्राप्त असणाऱ्या शाळांमधील इयत्ता आठवी पासून पुढील सर्व विद्यार्थ्यांचा यात समावेश करण्यात आला.

३) सर्व अध्यापक विद्यालयातील (D.EL.ED) छात्रअध्यापक यांनाही सहभागी करून घेण्यात आले.

४) सर्व अध्यापक विद्यालय व सर्व जिल्ह्यांतील प्राथमिक/माध्यमिक शिक्षणाधिकारी यांना पत्र देण्यात आले.

५) दिवाळीच्या सुट्टीनंतर सदरील उपक्रमाचे फोटो वापरून सोशल मीडियावर अपलोड करण्यास सांगितले.

- **उपक्रमाचा सांख्यिकीय तपशील :**

| अ. क्र. | उपक्रमाचे नाव | स्तर | उपक्रमाचा कालावधी | सहभागी घटक/ लाभार्थी |
|---|---|---|---|---|
| १) | 'या दिवाळीला साक्षरतेची भेट देऊया, सर्वांचे जीवन समृद्ध करूया.' | शाळा स्तर | दिवाळी सुट्टी २०२३ | इयत्ता सहावी ते आठवी व इयत्ता नववी ते दहावी आणि अध्यापक विद्यालयातील विद्यार्थी |

- **उपक्रमाची फलनिष्पत्ती :**

१) बहुतांशी भागात विद्यार्थ्यांनी घरातील व शेजारील असाक्षरांबरोबर साक्षरतेसाठी कृती करून घेतल्या.

२) इयत्ता सहावी ते दहावी आणि अध्यापक विद्यालयातील छात्रअध्यापकांनी नव भारत साक्षरता अभियानात सक्रिय सहभाग घेतला.

- **उपक्रमाचे फोटो :**



## ६) उपक्रमाचे नाव : सराव प्रश्नपत्रिका व आदर्श उत्तर पत्रिका निर्मिती

- **उपक्रमाची उद्‌दिष्टे :**

१) असाक्षर यांचा परीक्षेसाठी प्रश्नपत्रिकांचा अधिकाधिक सराव करून घेणे.

२) प्रश्नपत्रिका उपलब्ध करून देणे.

३) प्रश्नपत्रिकांच्या उत्तरपत्रिका तयार करणे.

४) दररोज एक प्रश्नपत्रिका PDF स्वरूपात देणे व त्याची उत्तरपत्रिका दुसऱ्या दिवशी देणे.

- **उपक्रमाच्या कार्यवाहीचे स्वरूप :**

१) राज्य साक्षरता विभागामार्फत तयार करण्यात आलेल्या प्रश्नपत्रिकेचे निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहितेच्या नियमांचा विचार करून प्रश्नपत्रिकेतील मजकूर अचूक करण्यात आला.

२) १० प्रश्नपत्रिका व त्याच्या उत्तरपत्रिका तयार करून अचूक असल्याची खात्री करून घेण्यात आली.

३) सर्व प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिकांच्या PDF तयार केल्या.

४) सराव प्रश्नपत्रिका नियोजन व्हॉटसॲपच्या माध्यमातून सर्व पर्यवेक्षीय यंत्रणा यांना देण्यात आले.

५) नियोजनाप्रमाणे दररोज एक प्रश्नपत्रिका PDF स्वरूपात व्हॉट्सॲप ग्रुपच्या माध्यमातून व त्याची उत्तरपत्रिका दुसऱ्या दिवशी पाठविण्यात आली.

६) स्वयंसेवकांनी, शिक्षकांनी या प्रश्नपत्रिकांचा सराव असाक्षरांकडून करून घेतला.

- **उपक्रमाचा सांख्यिकीय तपशील :**

| अ. क्र. | उपक्रमाचे नाव | स्तर | उपक्रमाचा कालावधी | सहभागी घटक/ लाभार्थी |
|---|---|---|---|---|
| १) | सराव प्रश्नपत्रिका व आदर्श उत्तर पत्रिका निर्मिती | राज्य स्तर | फेब्रुवारी महिन्याचा शेवटचा आठवडा व मार्च महिन्याचा पहिला आठवडा | असाक्षर |

- **उपक्रमाची फलनिष्पत्ती :**

१) असाक्षर व स्वयंसेवक यांना प्रश्नपत्रिकेचे स्वरूप समजण्यास मदत झाली.

२) १७ मार्च, २०२४ घेतल्या गेलेल्या मुख्य परीक्षेच्या पूर्वी असाक्षरांचा प्रश्नपत्रिका सराव झाला.

### ७) उपक्रमाचे नाव : १७ मार्च २०२४ पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी (FLNAT)

- **उपक्रमाची उद्दिष्टे :**

१) असाक्षरांची परीक्षा घेणे.

२) परीक्षा सुरळीत सुरू असल्याची खात्री करणे.

३) NIOS च्या साहाय्याने निकाल प्रकाशित करणे.

- **उपक्रमाच्या कार्यवाहीचे स्वरूप :**

१) परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी शिक्षण संचालनालय (योजना) कार्यालय यांच्यासोबत ऑनलाइन NIOS बैठकीचे आयोजन केले.

२) दि. १७ मार्च, २०२४ रोजी राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण यांच्या समन्वयाने ३६,००० केंद्रांवर, ४,५९,५३३ असाक्षरांची परीक्षा घेण्यात आली.

३) परीक्षा केंद्रांना भेटी देण्यात आल्या. तसेच SCERT मधील सहसंचालक व उपसंचालक यांनी परीक्षा समन्वयकांची जबाबदारी पार पाडली.

४) डायट व योजना कार्यालय यांचेकडून परीक्षेसंदर्भात प्राप्त माहिती तपासून NIOS यांचेकडे पाठविण्यात आली.

५) NIOS मार्फत व राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण यांच्या समन्वयाने असाक्षरांचा निकाल घोषित करण्यात आला.

- **उपक्रमाचा सांख्यिकीय तपशील :**

| अ. क्र. | उपक्रमाचे नाव | स्तर | उपक्रमाचा कालावधी | सहभागी घटक/ लाभार्थी |
|---|---|---|---|---|
| १) | १७ मार्च, २०२४ असाक्षरांची परीक्षा | राज्य स्तर | १७ मार्च, २०२४ | असाक्षर |

- **उपक्रमाची फलनिष्पत्ती :**

  १) १७ मार्च, २०२४ रोजी झालेल्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्यांचे प्रमाण ९२.६८ इतके आहे.

- **उपक्रमाचे फोटो :**













- उपक्रमास मिळालेली प्रसिद्धी :



# आजी-आजोबाही लागले अभ्यासाला; १७ रोजी परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** केंद्र सरकारच्या उल्लास-नव भारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत राज्यभरात ६ लाख २० हजार निरक्षरांची नोंद झाली असून, त्यापैकी पाच लाख निरक्षर येत्या १७ मार्चला परीक्षेला सामोरे जाणार आहेत. सध्या दहावी - बारावीच्या परीक्षांसह इतरही विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरू आहेत. त्यामुळे या परीक्षेच्या निमित्ताने नातवंडांसह आजी - आजोबाही अभ्यासात सध्या मग्न आहेत.

१५ वर्ष आणि त्यावरील वयोगटातील निरक्षरांना साक्षर करण्याबरोबरच त्यांच्यात महत्वपूर्ण जीवन कौशल्ये विकसित करण्याचे आव्हान या योजनेंतर्गत पेलायचे आहे.

**सर्वाधिक निरक्षरांची नोंदणी झालेले जिल्हे**

| जिल्हा | नोंदणी |
|---|---|
| जळगाव | ६७,५७५ |
| गडचिरोली | ६०,७७७ |
| चंद्रपूर | ३६,७४६ |
| अमरावती | ३३,५४३ |
| नंदुरबार | ३२,२४२ |

**कशी असेल परीक्षा**

१ या कौशल्यांमध्ये आर्थिक, कायदेविषयक, डिजिटल साक्षरता, आपत्ती व्यवस्थापन कौशल्य, आरोग्याची काळजी व जागरूकता, बालसंगोपन, शिक्षण आणि कुटुंब कल्याण इत्यादी बाबींचा समावेश आहे.

२ या कार्यक्रमात उल्लास ॲपवर निरक्षराच्या नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. १७ मार्चला सकाळी १०:०० ते सायंकाळी ५:०० या वेळेत परीक्षा केंद्रांवर जाऊन ही पायाभूत चाचणी परीक्षा द्यावयाची आहे.

३ उल्लास ॲपवरील नोंदणीकृत निरक्षर व्यक्तीच परीक्षा देण्यास पात्र असेल. उत्तर पत्रिकेतील माहिती व उत्तरे लिहिण्यासाठी फक्त काळ्या किंवा निळ्या शाईचा पेन वापरावा. पेन्सिल अथवा इतर रंगाच्या शाईचा पेन वापरू नये, अशी सूचना योजना शिक्षण उपसंचालक राजेश क्षीरसागर यांनी परीक्षार्थींना केली आहे.



**अभियान** • लहानपणी शाळेत गेले असते तर शेतीकामातून झाली असती सुटका

# मनात धास्ती, मात्र प्रत्यक्षात पेपर होता खूप सोपा; नवसाक्षरांनी मांडल्या भावना

**३२५९ पैकी १४७७ नवसाक्षरांनी दिली परीक्षा**

प्रतिनिधी | चाळीसगाव

लहानपणी शाळेत गेलो असतो तर आज शेतीच्या कामातून सुटका झाली असती, आणि शिक्षणामुळे मानसन्मान मिळून भविष्यात मुलांना देखील उच्च पदापर्यंत नेले असते. गेल्या अडीच दिवसांपासून पेपरची खूप मोठी धास्ती मनात निर्माण झाली होती. मात्र प्रत्यक्षात पेपर खूप सोपा होता. तीन तास वेळ दिलेला होता. मात्र शेतात कामाची लगबग असल्याने जेवढे सोडवता आले तेवढे सोडवून पुन्हा शेताची वाट धरली. शिक्षण खूप चांगले असते हे आज मला कळले, अशी भावना तालुक्यातील ओझर गावातील नवसाक्षर सुनंदा जाधव यांनी व्यक्त केली. रविवारी तालुक्यात १४७७ नवसाक्षरांनी परिक्षा दिली. अशिक्षितांना साक्षर करण्यासाठी केंद्र सरकारने उल्हास ॲपवर नवसाक्षर कार्यक्रम हाती घेतला. गावागावातील जे अशिक्षित असतील त्यांची नोंदणी करत त्यांना गेल्या तीन महिन्यांपासून गावातील इयत्ता आठवी ते बारावीपर्यंत शिक्षण झालेल्या तरुणाच्या हाती शिकवण्याचे काम देण्यात आले. चाळीसगाव तालुक्यात ३२५९ नवसाक्षरांची नोंद उल्हास ॲपवर करण्यात आली होती. त्यांना साक्षर करण्यासाठी रविवारी

सुनंदा जाधव

ओझर जिल्हा परिषद शाळेत पेपर सोडवताना नवसाक्षर सोबत शिक्षक वर्ग.

**चाळीसगाव तालुक्यात २२६ केंद्रांवर झाली परीक्षा**

ओझर येथील नवसाक्षरांना स्वयंसेविका नेहा गायकवाड हिने तीन महिने शिकविले. मुख्याध्यापिका व केंद्र संचालक छाया पाटील, मंदा चव्हाण, पर्यवेक्षक वंदना पाटील, शालिग्राम निकम, सतीलाल सोनवणे, रजुबाई खैरनार धनंजय आमले, संध्या मांडगे, योगिता पाटील, दिलीप महाजन, प्रियंका चौधरी आदी जण उपस्थित होते. यावेळी पातोंडा केंद्रप्रमुख जयप्रकाश चौधरी यांनी भेट देत नवसाक्षरांशी संवाद साधला.

**शिक्षकाची भूमिका कळली** • अशिक्षित नागरिकांना शिकवताना मला शिक्षकाची भूमिका कळली. शिक्षक सर्वच मुलांना समजून घेतात तसं मला या असाक्षर नागरिकांना समजून घ्यावे लागत होते. मात्र शिकवताना खूप आनंद मिळाला. माझे शिक्षण १२वी झाले असल्याने माझ्या हातून गावातील ९ असाक्षर नागरिकांना पढवले जात असल्याचे मला समाधान आहे. तीन महिने जणू मी शिक्षकच झाल्याचा भास होत होता. **नेहा गायकवाड,** स्वयंसेविका ओझर

सकाळी १० ते सायं. ५ वाजेदरम्यान पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी घेण्यात आली. नामवाडी जिल्हा परिषद, माध्यमिक अशा सर्व मिळून २२६ शाळांवर परीक्षा झाली. यात ३२०० नवसाक्षरांपैकी १४७७ नवसाक्षरांनी हजेरी लावत परीक्षा दिली. अशी माहिती गटशिक्षणाधिकारी विलास भोई यांनी

**अपयश आल्यास पुन्हा परीक्षा**

आठवी ते बारावी शिक्षण असलेल्या विद्यार्थ्यांमार्फत तीन महिन्यांपासून असाक्षरांचे वर्ग घेण्यात आले. त्यांची १५० गुणांची परीक्षा झाली. त्यात ५० गुण लेखन, ५० गुण वाचन व ५० गुण गणितासाठी होते. जे नवसाक्षर १५० पैकी ५१ गुण मिळवतील, त्यांना साक्षर मानले जाईल. तर ज्यांना ५१ पेक्षा कमी गुण मिळतील, त्यांचे पुन्हा वर्ग घेतले जातील व सप्टेंबर २०२४ मध्ये पुन्हा परीक्षा घेतली जाणार आहे. उत्तीर्ण झालेल्यांना प्रमाणपत्र देखील मिळणार आहे.

**या मुद्द्यांवर झाली परिक्षा**

नवसाक्षरांना पायाभूत शिक्षणात बाराखडी, अंकलेखन, वाचन, निरीक्षण चित्र ओळख आदींचा समावेश होता. उदा. पक्षादि चित्र दाखवून त्यातील संख्या किंवा अक्षर ओळखणे, लेखन करणे आदींचा परीक्षेत समावेश होता.

## केंद्रपुरस्कृत उल्लास - नव भारत साक्षरता कार्यक्रम (NBSK)

### प्रपत्र - सन २०२४-२५ साठीचे जिल्हानिहाय उद्दिष्ट (असाक्षर/स्वयंसेवक व्यक्तींची संख्या)

| अ. क्र. | जिल्हा | ०६ मार्च, २०२४ च्या वितरण आदेशानुसार दिलेले सन २०२२-२३ चे उद्दिष्ट | एप्रिल, २०२४ मध्ये दिलेले २०२३-२४ चे उद्दिष्ट (लोकसंख्येच्या/निरक्षर प्रमाण | सन २०२४-२५ साठीचे एकूण उद्दिष्टे (३+४=५) | सन २०२२-२३ च्या उद्दिष्ट्यां-पैकी झालेले काम उल्लास ॲपवरील नोंदणी) | सन २०२४-२५ मध्ये करावयाची असाक्षर नोंदणी (उल्लास ॲपवरील नोंदणी) (५-६=७) | मार्च २०२४ मध्ये FLNAT परीक्षा दिलेली असाक्षर संख्या | परीक्षेस बसलेल्या असाक्षरांपैकी Need Improve-ment शेरा प्राप्त संख्या | सन २०२४-२५ मध्ये परीक्षेस बसावयाची असाक्षर संख्या (५-८+९= १०) | सन २०२४-२५ चे स्वयंसेवक उद्दिष्ट (असाक्षर नोंदणी उद्दिष्टां नुसार स्तंभ क्र. ७) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** | **8** | **9** | **10** | **11** |
| 1 | अहमदनगर | 13202 | 29822 | **43024** | 14389 | 28635 | 8694 | 294 | **34624** | 2864 |
| 2 | अकोला | 24250 | 6696 | **30946** | 25101 | 5845 | 19369 | 1646 | **13223** | 585 |
| 3 | अमरावती | 28418 | 11656 | **40074** | 32387 | 7687 | 25582 | 266 | **14758** | 769 |
| 4 | छ. संभाजीनगर | 17837 | 23684 | **41521** | 17206 | 24315 | 15319 | 719 | **26921** | 2432 |
| 5 | भंडारा | 8927 | 6324 | **15251** | 9128 | 6123 | 8254 | 33 | **7030** | 612 |
| 6 | बीड | 14582 | 18662 | **33244** | 12819 | 20425 | 12145 | 182 | **21281** | 2043 |
| 7 | बुलढाणा | 11327 | 13330 | **24657** | 15069 | 9588 | 10712 | 266 | **14211** | 959 |
| 8 | चंद्रपूर | 33374 | 14322 | **47696** | 39387 | 8309 | 26671 | 2490 | **23515** | 831 |
| 9 | धुळे | 11154 | 16554 | **27708** | 10852 | 16856 | 10180 | 4 | **17532** | 1686 |
| 10 | गडचिरोली | 56400 | 8804 | **65204** | 63461 | 1743 | 34242 | 745 | **31707** | 174 |
| 11 | गोंदिया | 9817 | 6448 | **16265** | 9718 | 6547 | 8470 | 94 | **7889** | 655 |

| अ. क्र. | जिल्हा | ०६ मार्च, २०२४ च्या वितरण आदेशानुसार दिलेले सन २०२२-२३ चे उद्दिष्ट | एप्रिल, २०२४ मध्ये दिलेले २०२३-२४ चे उद्दिष्ट (लोकसंख्ये-च्या/निरक्षर प्रमाण | सन २०२४-२५ साठीचे एकूण उद्दिष्टे (३+४=५) | सन २०२२-२३ च्या उद्दिष्ट्यां-पैकी झालेले काम उल्लास ॲपवरील नोंदणी) | सन २०२४-२५ मध्ये करावयाची असाक्षर नोंदणी (उल्लास ॲपवरील नोंदणी) (५-६=७) | मार्च २०२४ मध्ये FLNAT परीक्षा दिलेली असाक्षर संख्या | परीक्षेस बसलेल्या असाक्षरांपैकी Need Improve-ment शेरा प्राप्त संख्या | सन २०२४-२५ मध्ये परीक्षेस बसावयाची असाक्षर संख्या (५-८+९= १०) | सन २०२४-२५ चे स्वयंसेवक उद्दिष्ट (असाक्षर नोंदणी उद्दिष्टां नुसार स्तंभ क्र. ७) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** | **8** | **9** | **10** | **11** |
| 12 | हिंगोली | 11250 | 7936 | **19186** | 12259 | 6927 | 9075 | 317 | **10428** | 693 |
| 13 | जळगाव | 59790 | 27900 | **87690** | 71863 | 15827 | 40710 | 3869 | **50849** | 1583 |
| 14 | जालना | 15284 | 16988 | **32272** | 15695 | 16577 | 11304 | 194 | **21162** | 1658 |
| 15 | कोल्हापूर | 3450 | 23126 | **26576** | 2866 | 23710 | 2346 | 62 | **24292** | 2371 |
| 16 | लातूर | 5061 | 17236 | **22297** | 4734 | 17563 | 3343 | 318 | **19272** | 1756 |
| 17 | मुंबई शहर | 6289 | 10602 | **16891** | 4980 | 11911 | 1891 | 127 | **15127** | 1191 |
| 18 | मुंबई उपनगर | 16040 | 29760 | **45800** | 15339 | 30461 | 10347 | 231 | **35684** | 3046 |
| 19 | नागपूर | 12822 | 17112 | **29934** | 12450 | 17484 | 7464 | 855 | **23325** | 1748 |
| 20 | नांदेड | 21447 | 25358 | **46805** | 22232 | 24573 | 18429 | 253 | **28629** | 2457 |
| 21 | नंदुरबार | 30320 | 16988 | **47308** | 32627 | 14681 | 16216 | 411 | **31503** | 1468 |
| 22 | नाशिक | 32253 | 32736 | **64989** | 35265 | 29724 | 25215 | 233 | **40007** | 2972 |
| 23 | धाराशिव | 7860 | 11284 | **19144** | 5769 | 13375 | 4061 | 154 | **15237** | 1338 |
| 24 | परभणी | 20025 | 15004 | **35029** | 21118 | 13911 | 14788 | 133 | **20374** | 1391 |

| अ. क्र. | जिल्हा | ०६ मार्च, २०२४ च्या वितरण आदेशानुसार दिलेले सन २०२२-२३ चे उद्दिष्ट | एप्रिल, २०२४ मध्ये दिलेले २०२३-२४ चे उद्दिष्ट (लोकसंख्ये-च्या/निरक्षर प्रमाण | सन २०२४-२५ साठीचे एकूण उद्दिष्टे (३+४=५) | सन २०२२-२३ च्या उद्दिष्ट्यां-पैकी झालेले काम उल्लास ॲपवरील नोंदणी) | सन २०२४-२५ मध्ये करावयाची असाक्षर नोंदणी (उल्लास ॲपवरील नोंदणी) (५-६=७) | मार्च २०२४ मध्ये FLNAT परीक्षा दिलेली असाक्षर संख्या | परीक्षेस बसलेल्या असाक्षरांपैकी Need Improve-ment शेरा प्राप्त संख्या | सन २०२४-२५ मध्ये परीक्षेस बसावयाची असाक्षर संख्या (५-८+९= १०) | सन २०२४-२५ चे स्वयंसेवक उद्दिष्ट (असाक्षर नोंदणी उद्दिष्टां नुसार स्तंभ क्र. ७) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 25 | पुणे | 10375 | 40610 | **50985** | 12677 | 38308 | 9387 | 346 | **41944** | 3831 |
| 26 | रायगड | 8373 | 13950 | **22323** | 10215 | 12108 | 7704 | 710 | **15329** | 1211 |
| 27 | रत्नागिरी | 15336 | 9548 | **24884** | 15547 | 9337 | 13470 | 680 | **12094** | 934 |
| 28 | सांगली | 6458 | 16864 | **23322** | 8167 | 15155 | 7427 | 0 | **15895** | 1516 |
| 29 | सातारा | 5414 | 16492 | **21906** | 5651 | 16255 | 3955 | 99 | **18050** | 1626 |
| 30 | सिंधुदुर्ग | 691 | 4030 | **4721** | 306 | 4415 | 225 | 0 | **4496** | 442 |
| 31 | सोलापूर | 21309 | 31372 | **52681** | 22884 | 29797 | 17847 | 416 | **35250** | 2980 |
| 32 | ठाणे | 20398 | 25916 | **46314** | 24657 | 21657 | 16683 | 3606 | **33237** | 2166 |
| 33 | पालघर | 20398 | 25916 | **46314** | 17190 | 29124 | 13340 | 717 | **33691** | 2912 |
| 34 | वर्धा | 5123 | 5580 | **10703** | 1888 | 8815 | 1359 | 95 | **9439** | 882 |
| 35 | वाशीम | 21620 | 6324 | **27944** | 20778 | 7166 | 11318 | 2346 | **18972** | 717 |
| 36 | यवतमाळ | 13326 | 15066 | **28392** | 15989 | 12403 | 12452 | 1182 | **17122** | 1240 |
| | एकूण | **620000** | **620000** | **1240000** | **662663** | **577337** | **459994** | **24093** | **804099** | **57734** |




राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

**राज्य साक्षरता केंद्र,**

**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.**

साक्षरतेकडून समृद्धीकडे...

राज्य साक्षरता केंद्र, महाराष्ट्र, पुणे